अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | गुरुवार, दि. ६ ऑक्टोबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ९ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

शिंदे ही बाप चोरणारी औलाद : ठाकरे

ठाकरे ही बाप विकणारी औलाद : शिंदे



माणसाची हाव किती असते? इतरांना बाजूला सारून तुला आमदार केलं मंत्री केलं, आता मुख्यमंत्री झाला. पण तरी शिवसेनाप्रमुख व्हायचंय यांना. शिवसेनाप्रमुख म्हणून त्याला स्वीकारणार का तुम्ही? आहे का लायकी त्याची? एकतर स्वत:च्या वडिलांच्या नावाने मतं मागण्याची हिंमत नाही. बाप चोरणारी औलाद. स्वत:च्या वडिलांचा तरी विचार करायचा. त्यांना वाटेल काय हे दिवटं कार्ट माझ्या पोटी जन्माला आलं जे माझ्याऐवजी दुसऱ्याच्या बापाचं नाव लावतंय, अशा शब्दात शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर घणाघाती शाब्दिक हल्ला केला.

दसरा मेळाव्यात शिवसैनिकांना संबोधित करताना उद्धव ठाकरेंनी एकनाथ शिंदे आणि शिंदे गटाला रावणाची उपमा दिली. रावण १० तोंडांचा होता, आत्ताचा रावण ५० खोक्यांचा आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले. तसेच, रावणाने संन्याशाचं रुप येऊन सीतेचं हरण केलं होतं, तसं हे तोतये बाळासाहेबांचा चेहरा लावून शिवसेना हडपायला आले आहेत. शिवाजी पार्क मिळू नये म्हणून हे मागे लागले. कोर्टात निकाल लागल्यानंतर मुख्यमंत्री म्हणतात जर मी लक्ष घातलं असतं, तर यांना हे मैदान मिळालं नसतं. काय बापाची पेंड आहे तुमच्या? गद्दार तर आहेतच.

✔ सुराज्य/मुंबई

इकडे मनात राग; तिकडेही मनात राग... शिवतीर्थावरही द्वेष अन् बीकेसी मैदानावरही द्वेष... ठाकरेंच्या मनात गद्दारांबद्दल राग तर शिंदेंच्या मनात ठाकरेंबद्दल राग...तिकडेही तोंडसुख अन् इकडेही तोंडसुख... दोन्हीकडून टीकेचा भडिमार... दोन्हीकडून आरोप-प्रत्यारोपांचे बाण... दसरा मेळाव्यातील वैचारिक सोने लुटण्याचा विचार राहिला बाजूला... रंगला उकाळ्या पाकाळ्या काढण्याचा सामना... ठाकरे म्हणाले शिंदे ही बाप चोरणाऱ्यांची औलाद... शिंदे म्हणाले ठाकरे ही बाप विकणाऱ्याची औलाद. दोन्ही बाजूने एकमेकांवर झाला तो फक्त शाब्दिक हल्ला.

आम्ही गद्दारी केली नाही, तर गदर केलाय. गदर म्हणजे क्रांती. आम्ही गद्दार नाही, तर बाळासाहेबांचा शिलेदार आहोत. ते आम्ही अभिमानाने छाती ठोकपणे सांगू शकतो. तुम्ही तर त्यांचे विचार विकले. आम्हाला बाप चोरणारी टोळी म्हणता. अरे तुम्ही तर बापाचे विचार विकले, तुम्ही बापालाच विकण्याचा प्रयत्न केला. आम्ही तुम्हाला ती टोळी म्हणायचं का? सहन करण्याची एक मर्यादा असते. सत्तेसाठी तुम्ही हिंदुत्वाला तिलांजली दिली, मग खरे गद्दार कोण? जनतेला समजलं आहे. म्हणून जनता आमच्याबरोबर आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांच्यावर चौफेर फटकेबाजी केली.

बीकेसी मैदानावर शिंदे गटाच्या दसरा मेळाव्यात बोलताना मुख्यमंत्री शिंदे हे उध्दव ठाकरेंवर अक्षरश:: तुटून पडले. ते म्हणाले, बाळासाहेबांचे विचार तोडून, मोडून मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. आमदारांनी विरोध केला, मी त्यांना सांगितलं, मला काही नको. पण, छातीवर दगड ठेवून मी त्यांच्यासोबत राहिलो. तुम्हाला लाज वाटली पाहिजे होती, मुख्यमंत्रिपदाची शपथ घ्यायला. नारायण राणे बोलले, बाळासाहेब ठाकरे असते हा मुख्यमंत्री झाला नसता. तुमची लायकी तुम्ही काढताय, असा घणाघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर केला आहे.

'पुष्पा' चित्रपटावरून उद्धव ठाकरेंची टोलेबाजी

दरम्यान, यावेळी बोलताना उद्धव ठाकरेंनी पुष्पा चित्रपटातील डायलॉगवरूनही शिंदे गटाला टोला लगावला. पुष्पा चित्रपट आला होता ना. त्यात झुकेगा नहीं साला' म्हणत होता. आणि हे म्हणतात उठेगा नहीं साला. एक बार झुकेगा तो उठेगाच नही! आता यांच्या सरकारला १०० दिवस होतायत. त्यातले ९० दिवस दिल्लीलाच गेले असतील. तिथे मुजरा करायला. दिल्लीत मुजरा आणि गल्लीत गोंधळ, असा टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

तुम्ही भाजपची स्क्रिप्ट न घेता..

एकनाथ शिंदे भाजपची स्क्रिप्ट घेऊन बोलतात, माझं आव्हान आहे. एकच व्यासपीठ. तुम्ही तुमची भूमिका मांडा, मी माझी भूमिका मांडतो. तुम्ही भाजपची स्क्रिप्ट न घेता भाषण करून दाखवायचं. मी मुख्यमंत्री असताना ४-५ पत्रकार परिषदा झाल्या. माझ्या बाजूला अजित पवार बसायचे. कधीच त्यांनी माझ्यासमोरचा माईक खेचला नव्हता. माझ्या कानात माझं उत्तर सांगितलं नव्हतं, अशी उपहासात्मक टिप्पणी उद्धव ठाकरेंनी यावेळी केली.

आरएसएसवर बंदीची मागणी अतिशय हास्यास्पद

या देशाच्या उभारणीत आरएसएसचं मोलाचं योगदान आहे. या देशावर आलेली प्रत्येक आपत्ती आणि संकटात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने एकदिलाने काम करताना आपण पाहिलं आहे. राष्ट्र उभारणीच्या पवित्र कार्यात या संघटनेचा हात कुणीच धरू शकत नाही. तुम्ही आरएसएसची आणि पीएफआयची तुलना करता. अरे थोडी तरी काही तरी वाटली पाहिजे. मनाची नाही, तर जनाची तरी वाटली पाहिजे. आरएसएसवर बंदीची मागणी अतिशय हास्यास्पद आणि मूर्खपणाची आहे.

कोविडमध्ये तुमची दुकानं सुरूच होती

तुमचा कारभार कुणालाही आवडत नव्हता. कोविड कोविड करून तुम्ही सर्वांना घरात बसवलं. दुकानं बंद केली, मंदिरं बंद केली, बाजारपेठा बंद केल्या, पण तुमची दुकानं सुरूच होती. कसली दुकानं सुरू होती हे मी बोलत नाही, पण चालू होती हे मला माहिती होतं. माझ्याशिवाय जास्त कुणाला माहिती असणार आहे?

बौद्ध काळात भारतासह अनेक देशांमध्ये समृद्धी अन् भरभराट : आयुक्त

शिस्तबद्ध मिरवणूक आणि धम्म संस्कार सोहळा

✔ सुराज्य/सोलापूर

दोन हजार वर्षांपूर्वी तथागत गौतम बुध्दांच्या काळात त्यांच्या विचारांमुळे भारत देशासह जगातील अनेक देशांमध्ये समृद्धी अन् भरभराट होती. त्यानंतर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानामुळे आपल्या देशाला नवी दिशा मिळाली. सामाजिक, आर्थिक व इतर क्षेत्रात समान संधी मिळाली. डॉक्टर आंबेडकरांचे विचार पुढे नेण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करूया असे प्रतिपादन महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी केले.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त समता सैनिक दलाच्या वतीने शानदार आणि शिस्तबध्दपणे मुख्य सोहळा सायंकाळी ठीक ७ वाजता नॉर्थकोट प्रशालेच्या मैदानावर वंदनीय भन्तेगण यांच्या मंगल उपस्थितीत संपन्न झाला. प्रमुख पाहुणे सोलापूर मनपाचे आयुक्त पी. शिवशंकर उपस्थित होते. त्याप्रसंगी ते बोलत होते.

दरम्यान, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी नॉर्थकोट मैदानावरील या धम्म संस्कार सोहळ्याला आवर्जून उपस्थिती दर्शवली. तथागत बुध्द व डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांना धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर इतर कार्यक्रमही आवर्जून पाहिले. यावेळी मिलिंद शंभरकर यांचा येथोचित्त सन्मान करण्यात आला.

सांगोला येथे पूर्वीच्या भांडणावरून घरास आग लावली; ३ लाखांचे नुकसान

✔ सुराज्य/सोलापूर

पूर्वीच्या भांडणावरून घराला आग लावल्याचा बदला घेण्यासाठी मध्यरात्रीच्या सुमारास घरात घुसून मारहाण करीत आग लावल्याने कपाटातील ३ लाखाची रोकड आणि इतर साहित्य असा ३ लाख २० हजाराचे नुकसान झाले. ही घटना सांगोला येथील कोपटे वस्तीत रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली.

या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी पप्पू इंगोले आणि सुभाष इंगोले(रा.सांगोला) याच्यासह चौघाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे. यासंदर्भात शालन भाऊसाहेब जानकर (वय ५० रा.कोपटेवस्ती, सांगोला) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली. शनिवारी रात्रीच्या सुमारास शालन जानकर त्यांच्या दोन सुना आणि मुलगी असे घरात झोपल्या होत्या. रविवारी पहाटे एक वाजेच्या सुमारास पुर्वीच्या भांडणावरून पप्पू इंगोले, सुभाष इंगोले याच्यासह चौघेजण घरात बसून शिवीगाळ केली. आणि सुनेला मारहाण केली. त्यानंतर सोबत आणलेले पेट्रोलचे बोळे टाकून आग लावली. त्या आगीत कागदपत्रे, कपाटातील ३ लाख रुपये आणि इतर साहित्य याचे नुकसान झाले. असे जानकर यांच्या फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास सहाय्यक निरीक्षक काटकर करीत आहेत. ऑगस्ट महिना अखेरीस पूर्वीच्या भांडणावरून पप्पू इंगोले (रा. कोपटेवस्ती सांगोला) यांच्या घरात घुसून पेट्रोल ओतून आग लावण्यात आली होती. त्यावेळी ५० ग्राम सोन्याचे दागिने चोरीस गेले होते. अशा आशयाची फिर्याद इंगोले यांनी दिली होती. या प्रकरणात सांगोल्याच्या पोलिसांनी धनाजी भाऊसाहेब जानकर आणि त्याच्या साथीदारावर गुन्हा दाखल केला होता.

निखाऱ्यावरून चालताना तरुण भाजला

✔ सुराज्य/सोलापूर : धार्मिक कार्यक्रमाच्या वेळी निखाऱ्यावरून चालताना ठेच लागून आगीत पडल्याने दोन्ही पाय भाजून तरुण जखमी झाला. ही घटना मार्डी (ता.उत्तर सोलापूर) येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर बुधवारी पहाटेच्या सुमारास घडली.

हर्षवर्धन बबन साठे (वय १९) असे जखमीचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. गावात नागनाथ महाराजांची यात्रा असल्याने धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायत कार्यालयासमोर निखारा पेटवण्यात आला होता. पहाटे ५ वाजेच्या सुमारास हर्षवर्धन साठे हा निखाऱ्यावरून पायी जात होता. त्याचे दोन्ही पाय गुडघ्यापर्यंत भाजले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

खर्चासाठी पैसे न दिल्याने डोक्यात घातला दगड

✔ सुराज्य/सोलापूर : जुना विडी घरकूल परिसरातील क्षिरालिंग नगरातील दुर्गादेवी मंदिरासमोर ही घटना घडली.

अक्षयकुमार मोहन पोगुल हा मित्रांसोबत गप्पा मारत होता. त्यावेळी त्याच्या ओळखीचा सिद्राम देविदास अंबाल त्याठिकाणी आला. खर्चासाठी काही पैसे उसने दे म्हणून सिद्रामने अक्षयकुमारला हटकले. त्यावेळी माझ्याकडेच पैसे नाहीत, तुला कुठून देणार, असे उत्तर दिले. त्या रागातून सिद्रामने शिवीगाळ सुरू केली. शेवटी त्याने रस्त्यावरील दगड हातात घेऊन अक्षयकुमारच्या डोक्यात घातला व दमदाटी केली. अक्षयकुमारच्या फिर्यादीवरून सिद्राम अंबालविरूध्द एमआयडीसी पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे.पोलिस नाईक कांबळे तपास करीत आहेत.

आ. शहाजी पाटलांची ठाकरे, पवारांवर टीका

✔ सुराज्य/मुंबई : शिंदे गटाकडून शहाजीबापू पाटिल यांनी उद्धव ठाकरे यांच्या सोबतच शरद पवार आणि अजित पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल करत आहेत. शहाजीबापू यांनी उद्धव ठाकरे यांचा एकेरी उल्लेख करत म्हणाले उद्धव ठाकरेंनी फडणवीसांच्या पाठीत खंजीर खुपसला, बाळासाहेबांची सभा नेहमी टीव्हीवरुन पाहिली आहे.

तर शरद पवारांनवर टीका करतांना म्हणाले शिवसेना प्रमुख कुणाला मैद्याचं पोतं म्हणाले, शरद पवारांच, बिनधास्त नाव घ्या अजिबात लाजू नका. तर अजित पवारांना ममद्या म्हणाले होते. याची आठवण शहाजी पाटील यांनी यावेळी करुन दिली. अडीच वर्ष राज्याचे तुकडे केले आहेत. आता आणखी काय करणार आहात असं म्हणत महाविकास अघाडीवर टीका केली.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

हे राम !!!

कल्याण
240-67-269

मेन बाजार
156-24-130

सीमोल्लंघनाने नवरात्र उत्सवाची सांगता

'आई राजा उदो-उदो'च्या जयघोषात मानाच्या पालख्यांची मिरवणूक

✔ सुराज्य/सोलापूर

तब्बल दोन वर्षा नंतर साजरा झालेल्या नवरात्र उत्सवाची सीमोल्लंघनाने सांगता झाली आई राजा उदो-उदो च्या प्रचंड जयघोषात मानाच्या पालख्यांची प्रदक्षिणा होऊन अत्यंत मंगलमय अशा वातावरणात सीमोल्लंघन पार पडले नवरात्र उत्सवाची मिरवणुकीत शहरातील विविध मानाच्या देवस्थानच्या नंदिध्वज पालख्या छबिनासह सार्वजनिक मंडळाच्या श्रीदेवी मूर्ती सह वाजत गाजत सहभागी झाल्या होत्या.

कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर सलग दोन वर्षे शमीच्या वृक्षाला मानाच्या पालख्यांची प्रदक्षिणा आणि सीमोल्लंघन झालं नाही. माता रुपाभवानी मंदिरातचं आई राजा उदो-उदोच्या जयघोषात मानाच्या पालखीची प्रदक्षिणा आणि सीमोल्लंघन करण्यात आला होत.

यंदा मात्र कोरोनाचे संकट कमी झाल्यानं आणि सर्व प्रकारचे निर्बंध उठवल्यानं सोलापूर शहर परिसरात शारदीय

नवरात्र उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. शक्तीदेवीच्या उपासनेत सोलापूर नगरी जणू हरवून गेली होती. विविध मंडळांच्या वतीने सामाजिक आणि धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होते.

दरम्यान बुधवारी ५ ऑक्टोबर रोजी विजयादशमीचा निमित्त सर्वत्र उत्साहाचे आणि चैतन्याचं वातावरण होतं. सीमोल्लंघन सोहळ्याकडं सर्वांचचं लक्ष लागून राहिलं होते दरम्यान मध्यवर्ती नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने तुळजापूर वेस येथे जय भवानी तरुण मंडळाच्या अग्रमानीनी अशा मानाच्या देवीची पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत पूजन करण्यात येऊन विविध नवरात्र उत्सव मंडळाच्या मिरवणुकींना प्रारंभ झाला. यावेळी उत्सव अध्यक्ष श्रीशैल बनशेट्टी , सचिव दत्तात्रय मेनकुदळे, तसचे मध्यवर्तीचे सर्व पदाधिकारी यांच्यासह सुनील रसाळे, संजय शिंदे, गणेश चिंचोळी, विजय पुकाळे आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती.

दरम्यान सोलापूरची आराध्य दैवत माता रुपाभवानीचं दर्शन येऊन, पार्क मैदानातील शमीच्या वृक्षाचं पूजन करण्यासाठी आणि दर्शन घेण्यासाठी सायंकाळी भक्तगणांनी चांगलीचं गर्दी केली होती. अनेकजण सहकुटुंब सहपरिवार पार्क चौपाटीवर सीमोल्लंघनासाठी उपस्थित राहिल्याने भक्तीसागराला जणू उधाण आले होते. या पार्श्वभूमीवर सोलापूर महापालिका प्रशासन तसेच पोलीस प्रशासनाच्या वतीने या ठिकाणी योग्य ते नियोजन करण्या बरोबरचं आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली होती.

दरम्यान प्रथा-परंपरेनुसार समस्त जोशी परिवारातील सदस्य हे शमी वृक्षाच्या पूजनासाठी आले होते. त्यांनी मंगलमय वातावरणात शमीच्या वृक्षाचं पूजन आणि आरती केली. गजानन जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

सायंकाळी ७ वाजता माता रुपाभवानी मंदिराच्या पालखीने शमीच्या वृक्षास प्रदक्षिणा घातली. आई राजा उदो-उदो च्या प्रचंड गजरात, हलग्यांच्या कडकडाटात, संबळच्या निनादात शमीच्या वृक्षास अत्यंत उत्साहात पालखी प्रदक्षिणा पार पडली यामध्ये शिवलाल तेली समाज, जगंदब माता, भावसार समाज, गोंधळी समाज या मानाच्या पाच पालख्या आणि नंदिध्वज सहभागी झाले होते.

भक्तिभावानं सीमोल्लंघन सोहळा पार पडला असंख्य भक्तगणांची यावेळी उपस्थिती होती.

आयोगापुढे पेच

खरी शिवसेना कोणाची व धनुष्यबाण निवडणूक चिन्ह कोणाला मिळणार, या वादावर निवडणूक आयोगापुढे फैसला होणार असला तरी आता शिंदे गटाने उद्धव ठाकरे गटाची गोची केली आहे. आता शिंदे गटाने शिवसेनेचे पक्षप्रमख म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नावाचा दावा करणार असल्याची बातमी बाहेर पडल्याने ठाकरे यांच्यापुढे अजून एक मोठी चिंता निर्माण झालेली असणार. मुंबईतील अंधेरी पूर्व विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूकही जाहीर झाली. पण चिन्हाचा वाद सुटेल का? अशी चिन्हे दिसतात का? हा प्रश्न पुढे आला आहे. निवडणूक आयोगाने ठाकरे व शिंदे गटाला पुरावे सादर करण्यासाठी ७ ऑक्टोबपर्यंत मुदत दिली असून अंधेरी पूर्वपोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी १४ ऑक्टोबरची अंतिम मुदत आहे. उमेदवारांना अर्जासोबत पक्षाचे अधिकृत उमेदवार असल्याबाबतचे ए, बी अर्ज जोडावे लागतात. त्यामुळे आयोगाला सुनावणी व निर्णयासाठी जेमतेम आठवडाभराची मुदत असून दोन्ही बाजूंना वकिलांमार्फत बाजू मांडण्याची पुरेशी संधी देऊन आणि पुराव्यांची छाननी करण्यासाठी हा कालावधी अपुरा असल्याचे म्हटले जाते. आयोगाने या कालावधीत निर्णय देण्याचे ठरविलेच, तर अशक्य नाही. मात्र आयोगाने घाई करून, नैसर्गिक न्याय तत्त्वाचे पालन न करता किंवा पुरेसा वेळ न देता निर्णय दिला, असा आरोप ज्या गटाविरोधात निर्णय दिला जाईल, त्यांच्याकडून होऊ शकतो. त्याविरुद्ध सुप्रीम कोर्टातही जाता येईल. त्यामुळे आयोग घाईने अंतिम निकाल देण्याची शक्यता कमी दिसते. आयोग लोकसभा, विधानसभेतील लोकप्रतिनिधींचे व अन्य पदाधिकाऱ्यांचे बहुमत पाहून निर्णय घेणार की राष्ट्रीय कार्यकारिणी व पक्ष पदाधिकारी कोणाकडे आहेत, तांत्रिक मुद्दे काय आहेत, या निकषांवर निर्णय घेणार, हे महत्त्वाचे आहे. पक्षातील फूट जिथे विधिमंडळ पक्षातही दिसली, अशा निर्णयांत आयोगाने बहुमताची बाजू उचलून धरल्याने, शिवसेनेचे ४० आमदार, १२ खासदार आणि अनेक नगरसेवक, पदाधिकारी आपल्याबरोबर असल्याबाबतची शपथपत्रे शिंदे यांनी आयोगापुढे सादर केली आहेत. तर ठाकरे हे २०२३ पर्यंत पक्षप्रमुख म्हणून निवडले गेले असून त्यांना १५० सदस्यीय राष्ट्रीय कार्यकारिणीतील बहुसंख्य सदस्यांचा पाठिंबा आहे. जिल्हा, तालुका, विभाग प्रमुख व इतरांचा पाठिंबा असल्याची कैक शपथपत्रे ठाकरे गटानेही सादर केली आहेत. विधान परिषदेतील किती आमदार शिंदे यांच्या बाजूने आहेत, हे गुलदस्त्यात आहे. वकिलांचे युक्तिवाद, अन्य काही मुद्यांवर सुनावणी लांबल्यास किंवा पुराव्यांच्या छाननीस वेळ लागणार असल्यास अंधेरी पोटनिवडणुकीसाठी अंतरिम आदेश देण्यासाठी शिंदे गटाकडून आयोगास विनंती केली जाऊ शकते. ठाकरे व शिंदे गटाकडून धनुष्यबाण या राखीव चिन्हाची मागणी केली गेल्यास ते गोठविण्याचा आदेश आयोगाकडून दिला जाऊ शकतो, असे सांगितले जाते. आपल्याला धनुष्यबाण मिळत नसल्यास ते गोठविण्याचा शिंदे गट खचितच प्रयत्न करणार. एखाद्या चिन्हावर दोन पक्षांनी दावा केल्याने वाद झाल्यास ते चिन्ह गोठविल्याचे व दोघांना स्वतंत्र चिन्ह दिल्याची याआधीची उदाहरणे आहेत. शिवसेनेतील वाद वेगळा असून ठाकरे गटानेही जोरदार कायदेशीर तयारी केली आहे. पक्षप्रमुख पद उद्धव ठाकरे यांच्याकडे असून त्यांना राष्ट्रीय कार्यकारिणीतील बहुसंख्य सदस्यांचा पाठिंबा आहे. शिंदे यांना धनुष्यबाण चिन्ह हवे असेल, तर पक्षप्रमुख पदावर दावा सांगणे अपरिहार्य असून कायदेशीर सल्ला घेऊन ते तसा निर्णय घेण्याची शक्यता आहे. शिंदे सध्या विधिमंडळ गटनेते असून अखिलेश यांच्याप्रमाणे त्यांना कायदेशीर प्रक्रिया करावी लागेल. राखीव निवडणूक चिन्ह हे राजकीय पक्षाची ओळख, अस्मिता मानली जाते. केंद्रीय किंवा राज्य स्तरावरील पक्षप्रमुखाकडे पाहून मतदारसंघातील उमेदवाराला मत दिले जाते. १९८० च्या दशकामध्ये किंवा त्यानंतरच्याही काळात विशेषत: ग्रामीण भागात साक्षरता व राजकीय जाणीव कमी असताना अमुक निवडणूक चिन्हावर शिक्का मारा (मतदान यंत्रे तेव्हा नव्हतीच) असा प्रचार केला जाई. पण गेल्या काही वर्षांत भाजपसह अनेक पक्षांची निवडणूक चिन्हे बदलली. उद्धव ठाकरे यांच्या निकटवर्तीयांनी, धनुष्यबाण गोठल्यास ढाल-तलवार हे चिन्ह मागण्याची तयारी ठेवल्याचे सांगण्यात येते. सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या पक्षाचे व उमेदवाराचे निवडणूक चिन्ह पोहोचविणे, आजच्या काळात फारसे कठीण नाही. त्यामुळे निवडणूक चिन्ह हा मुद्दा मतदानाच्या दृष्टीने मर्यादित महत्त्वाचा असला तरी प्रतिष्ठेचा मात्र बनला आहे.

माफीचा संचालक शोधा-निम्मे काम होईल

प्रासंगिक — लक्ष्मी सहकारी बँकेच्या निमित्ताने...

लक्ष्मी सहकारी बँक सध्या अवसायकाचे हाती आहे. अवसायक हा सहकारी खात्यातील आहे. सहकार कायद्याअंतर्गत सहकारी संस्थांवर जे नियंत्रण ठेवायचे असते, त्या नियंत्रण व्यवस्थेतील तो आहे.या व्यवस्थेतील सर्वोच्च पदावर सहकार आयुक्त नावाची व्यक्ती तथा अधिकारी कार्यरत असते. ज्या अर्थी व्यवस्थापनामध्ये लक्ष्मी बँक कमी पडलेली आहे असे म्हटले जाते, त्याअर्थी सहकार कायद्यात नियंत्रणाची जी व्यवस्था कार्यरत आहे, ती कमी पडलेली आहे असेच म्हणावे लागेल. एक तर ही व्यवस्था कुचकामी आहे. नाहीतर ही व्यवस्था प्रभावी नाही. वर्षानुवर्षे येणारे लेखापरीक्षण अहवाल आणि त्याच्या पाठोपाठ येणारे दोष दुरुस्ती अहवाल, केवळ रद्दीचे कागद समजून दुर्लक्षित केले गेलेले असले पाहिजेत असे म्हणावे लागेल.

सध्या सहकार खाते लक्ष्मी बँकेच्या हिशोबाची तपासणी करीत आहे, जे काही नुकसान झालेले आहे ते संचालकाच्या माथी मारू मोकळे होण्याच्या तयारीत असल्याचे समजते आहे. हे जर खरे असेल तर ते पूर्णतः चुकीचे आहे. हे असे नसेल तर सहकार खाते लक्ष्मी सहकारी बँकेच्या नेमक्या कोणत्या परिस्थितीची चौकशी आणि तपासणी करीत आहे हे समजले पाहिजे.

कोणत्याही सहकारी संस्थेच्या कामकाजाला संचालक मंडळ जबाबदार असतात. याबाबत दुमत असावयाचे कारण नाही. मात्र सगळेच संचालक एक जात दोषी असतात, अशी जर सहकार खात्याची समजुत असेल, रिझर्व बँकेची समजूत असेल तर ती चुकीची आहे. सहकार खाते साधारणतः धोपट मार्गाने कार्यरत असते. गेल्या अनेक वर्षांच्या त्यांच्या कार्यपद्धतीचा विचार केल्यानंतर हे नजरेस पडत आहे. वेळोवेळी बंद पडलेल्या सहकारी संस्था आणि बँका, यांच्या कार्यपद्धतीवर काही संशोधन करून, सहकार खात्याने त्यावर काही उपाय नव्याने सुचविले आहेत असे दिसून येत नाही.

सहकार खात्याचे लेखापरीक्षण म्हणजे आकडे मोडीचा खेळ असतो. शेरे ताशेऱ्याचा डाव असतो. चार ओळी लिहून जबाबदारी झटकण्यातला तो एक प्रकार आहे असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही. याचबरोबर रिझर्व बँक ऑफ इंडिया च्या तपासणीत लक्ष केंद्रित केले जाते ते आकडेमोडीवरती. ज्याला स्टॅटिस्टीकल फिगर्स असे म्हटले जाते. केवळ आकडेमोडीवरून जर कोणी संस्थेबाबत निर्णय घेत असेल तर ते तत्वतः आणि संपूर्णतः चुकीचेच आहे. संख्याशास्त्र माणसाला मूर्ख बनवू शकते, हे संख्याशास्त्र शिकवणारे प्रामाणिक प्राध्यापक विद्यार्थ्यांना आवर्जून सांगत असतात, हे इथे लक्षात घेतले पाहिजे. लेखापरीक्षक कोणत्याही सहकारी संस्थेमध्ये चालू असलेल्या आर्थिक गैर कारभाराला जबाबदार असतो असे म्हणता येणार नाही. त्यांनी नोंदवलेली निरीक्षणे आणि ओढलेले ताशेरे याकडे जर का वेळेत लक्ष दिले गेले नसेल, तर ती जबाबदारी कोणाची हे ही निश्चित झाले पाहिजे.

सहकारी बँकांच्या बाबतीमध्ये कर्ज वसुलीच्या संदर्भात ज्या अनेक अडचणी येतात, कायदेशीर बाबींची गुंतागुंत निर्माण झालेली असते, त्याला जबाबदार कोण? याची तपासणी कोण करणार? हा एक मोठा प्रश्न आहे. लेखापरीक्षकाला किंवा संचालकांना जबाबदार धरले की संपले, अशी जर कोणाची समजूत असेल तर ती, निव्वळ आणि निव्वळ सर्वांची केलेली फसवणूक आहे असे म्हणावे लागेल

कोणतेही कर्ज प्रकरण करीत असताना कर्जदारांनी दिलेली माहिती, त्याची करावयाची पडताळणी, कर्जासाठी तारण दिलेल्या मालमत्तांचे केलेले मूल्यांकन आणि या मालमत्तेच्या मालकी हक्कासंदर्भात दिले गेलेले कायदे तज्ञांची मत, याकडेही लक्ष दिले गेलेच पाहिजे. यामध्ये मूल्यांकन करणारे अभियंते आले, कायदेविषयक मत देणारे वकील आले. दिलेले कर्ज हे तारण दिलेल्या मालमत्तेच्या किमतीच्या अनेक पटीने जास्त होते, हे फक्त जर वसुलीच्या वेळेस लक्षात येत असेल तर दोष कोणाचा? तारण दिलेल्या मालमत्तेवर कर्ज देणाऱ्या बँकांना किंवा संस्थाना बोजा चढवताना, वसुली करताना अनेक अडचणी येत असतील तर तो दोष कोणाचा? कर्जासंबंधीची कागदपत्रे तयार करीत असताना त्यात त्रुटी राहिलेल्या असतील, तर त्यात दोष कोणाचा? या व अशा अनेक गोष्टींचा विचार झाला पाहिजे. विशेषतः जेव्हा बँकांसारखी एखादी सहकारी संस्था बुडीत निघते, तेंव्हा तरी याकडे कटाक्षाने लक्ष दिले गेलेच पाहिजे. बंद पडणाऱ्या सहकारी बँकांच्या व संस्थांच्या सर्व संचालकांना एकजात जबाबदार धरण्याची जी सहकार खात्याची मनोवृत्ती आहे, ती एकतर्फी आहे. त्यात शहाणपणा नाही. त्यात तारतम्य नाही आणि त्यात न्यायबुद्धी पण नाही. सगळेच संचालक एकजात बदमाश असतात, दोषी असतात, मतलबी असतात असे नाही. प्रत्येक संस्थेमध्ये राजकारण चालतेच चालते. कधी ते गटातटाचे असते, कधी जातीपातीचे असते, तर कधी राजकीय पक्षांशी निगडित असते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे यात सभासदही सहभागी झालेले असतात. त्यामुळे कोणत्याही सहकारी संस्थेच्या कारभाराबाबत संचालक मंडळावरती थेट दोषारोप करण्यापेक्षा, संचालक मंडळातील सदस्य, त्यांचे गट तट, त्यांचे हितसंबंध या सगळ्यांचाच विचार करावाच लागेल.

खून, दरोडे, बलात्कार, चोऱ्या, आर्थिक घोटाळे या व अशा प्रकारच्या तपासामध्ये माफीचा साक्षीदार घेण्याची पद्धत आहे. यामुळे नेमके काय घडले, कसे घडले आणि दोषी कोण हे निश्चित करण्यास मदत होते. बंद पडणाऱ्या सहकारी बँकावर कारवाई करीत असताना, रिझर्व बँक ऑफ इंडिया आणि सहकारी खाते ज्या पद्धतीने ताशेरे ओढत आहे, निरिक्षणे नोंदवत आहे, निर्णय देत आहे, ते पाहिले म्हणजे हे सारे तो धोपट मार्गाने चालु आहे असे म्हणावे लागेल. या धोपट मार्गाने प्रश्न सुटणारे नाहीत. एकंदरीतच सध्याची परिस्थिती, सरकारी धोरणे आणि सहकार विभागाची कार्यपद्धती पाहता, नजीकच्या भविष्यात ८० ते ९० टक्के सहकारी बँका बंद होण्याची भीती वाटते आहे. जर हे थांबवायचे असेल तर, प्रत्येक सहकारी बँकांवरील संचालकांमधील माफीचे संचालक शोधले पाहिजेत. त्यांचे कडून संपूर्ण वस्तुस्थिती समजून घेतली पाहिजे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारला, या निमित्ताने काही विशेष कायदे करावयाची आवश्यकता भासत असेल तर, ते केले पाहिजेत. ते करण्यापूर्वी आवश्यक त्या सर्व चर्चा झाल्या पाहिजेत. सर्व संचालकांना एकजात दोषी धरून बँका बंद करायच्या आणि वर्षानुवर्षे त्याची प्रलंबित ठेवायची यात शहाणपणा नाही. लक्ष्मी सहकारी बँकेच्या संदर्भात सध्या एक रकमी कर्जफेड योजना जाहीर केली गेलेली आहे. आमची विनंती आहे की या योजनेची अंमलबजावणी त्वरित थांबवली पाहिजे. बंद पडणाऱ्या बँकेमध्ये एक-दोन वर्ष वसुली थांबली तर काही फार मोठा फरक पडत नाही. कर्जदार, संचालक, संबंधित कागदपत्रे, त्यासाठी आलेली वकिलाची मते आणि अभियंत्यांची प्रमाणपत्रे यातील त्रुटींचा शोध घेतला गेला पाहिजे. अशा प्रकारे जर एक-दोन संस्थेची तपासणी झाली, तर सहकारी बँकांच्या कार्यपद्धतीत अमुलाग्र बदल होतील. सध्याचे कायदे सहकारी बँकांच्या नियंत्रणावरती आणि त्यांच्यावर करावयाच्या कारवाईबाबत अपुरे आणि अकार्यक्षम आहेत. याची नोंद घ्यावीच लागेल. याहीपेक्षा भयानक बाब म्हणजे सहकार खाते डोळ्याला झापड बांधल्यासारखे म्हणा अथवा घाण्याला लावलेल्या बैलासारखे म्हणा काबाडकष्ट करत आहे असे दिसते आहे. म्हणुनच मूळ उद्देशाकडे डोळे झाक होते आहे असे म्हणावे लागेल.

आम्ही जाहीर आवाहन करीत आहोत की सहकार खात्याने लक्ष्मी सहकारी बँकांतील माफीचे संचालक शोधावेत. गैर व्यवहाराच्या संदर्भातील तपासणीचे निम्मे काम सोपे होईल. बँकेत जे काही गैरप्रकार झालेले आहेत त्याची निरीक्षणे नोंदवून मग पुढील कारवाई करावी. तोपर्यंत रिकामी कर्जफेडीच्या प्रस्तावाला सुद्धा स्थगिती द्यायला हवी.

- श्रीनिवास वैद्य
चार्टर्ड अकाउंटंट

वस्तुमात्रांचा शक्तीशाली संवाद!

'इंटरनेट ऑफ थिंग्स' म्हणजेच आयओटी ही एकमेकांना जोडले गेलेली आणि एकमेकांशी थेट संवाद साधणाऱ्या उपकरणांची एक यंत्रणा किंवा जाळे असते. यात यांत्रिक आणि डिजिटल यंत्रे, वस्तू, प्राणी, पक्षी किंवा लोक समाविष्ट असतात. यात प्रत्येकाला ओळखता येईल अशी (युनिक आयडेंटीफायर) साधने परस्परांशी संवाद साधत असतात. ही साधने आणि स्वतःच परस्पर निर्णय घेऊन आपल्या नेटवर्क (जाळ्या) मध्ये कामे पूर्ण करत असतात. दैनंदिन जीवनात सर्व वस्तू अगदी सहज ओळखता येतील आणि वायरलेस कनेक्टिव्हिटीने त्या परस्परांशी जोडलेल्या असतील. तसेच या सर्व वस्तू एकमेकांशी संवाद करू शकतील आणि संगणकाद्वारे नियंत्रित करता येतील.

आयओटीमध्ये स्मार्ट' उपकरणे इंटरनेटशी जोडलेली असतात. आयओटी तंत्रज्ञानात उपकरणांना सूचना किंवा आज्ञा आपण आपल्या मोबाईलवरून देत इंटरनेटच्या माध्यमातून कनेक्टिव्हिटी असल्याने जगात कोठूनही दूर-नियंत्रण करू शकतो. स्मार्ट उपकरणाच्या मेमरीतदेखील त्या साठवल्या येतात. गरजेनुसार आधीच ठरवून दिलेल्या अटींवर आधारित त्या सूचना किंवा आज्ञा उपकरणांच्या एम्बेडेड सिस्टिमप्रमाणे साठविल्या जातात तसेच त्यांचे पालन करत स्वयंनिर्णय घेत स्मार्ट सिस्टीम' कार्यान्वित होते.

वस्तूमात्रांच्या संवाद-जाळ्यात' गुरफटतेय मानवी भविष्य असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. इंटरनेट ऑफ थिंग्स' चे भविष्य काय असेल हे पाहताना सातत्याने जगात होत असलेल्या बदलांचा प्रभाव या तंत्रज्ञानावर पाहावा लागेल. वायरलेस रेडिओचा आकार आणि किंमत प्रचंड कमी झाली आहे. ब्रॉडबँड आणि वायफाय यांचा वापर हा कमी खर्चिक असल्याने इंटरनेट ऑफ थिंग्स'च्या क्षमता नेहमीच वाढत आहेत. ब्रॉडबँड स्पीड देणाऱ्या अनेक नेटवर्क कंपन्यासह मोबाईल डेटा कव्हरेजमध्ये लक्षणीय सुधारणा करीत आहेत. अगदी परिपूर्ण नसले तरी बॅटरी तंत्रज्ञान सुधारले आहे आणि सौर रीचार्जिंग सुविधा अनेक उपकरणांमध्ये तयार करण्यात आली आहे. गोपनीयता व सुरक्षितता वाढविण्याच्या दृष्टीने तसेच इंटरनेट पायाभूत संरचना निर्मितीत मोठी गुंतवणूक केली जात आहे. आयपीव्हीसिक्स हे तंत्रज्ञान आपल्याला अब्जावधी यंत्रे किंवा वस्तू (डिव्हाइसेस) परस्परांशी संवाद (संप्रेषण) साधावा यासाठी प्रत्येक वस्तूला ओळखण्याचा पत्ता देण्याची सुविधा प्रदान करते आहे. त्यामुळे ती वेळ दूर नाही जेव्हा इंटरनेट ऑफ थिंग्स' सामान्यतः कुटुंब आणि कंपन्या दोन्हीमध्ये सर्रासपणे आणि सुलभतेने कार्य करील.

एबीआय' रिसर्चने अंदाजानुसार, २०१३ मध्ये पाच अब्जापेक्षा जास्त वायरलेस चिप्स काम करीत असलेल्या वस्तू कार्यरत झाल्या आहेत. पुढील अनेक वर्षांमध्ये नेटवर्कशी जोडणारी अब्जावधी वस्तू असतील. सिस्कोच्या इंटरनेट ऑफ थिंग्स ग्रुप' (आयओटीजी) च्या अंदाजानुसार २०२० अखेरपर्यंत शहाणा' उपकरणांची संख्या (कनेक्टेड डिव्हाइसेस) ५० अब्जांपेक्षा जास्त आहे.

इंटरनॅशनल डेटा कॉर्पोरेशन' (आयडीसी) नुसार वर्ष २०२० पर्यंत इंटरनेट ऑफ थिंग्स'क्षेत्रात १.७ ट्रिलियन डॉलर्सची उलाढाल अपेक्षित आहे, यात भारताचा ६ टक्के वाटा अपेक्षित आहे. जगभरातील कंपन्या टूथब्रशपासून तर विमानापर्यंत इंटरनेट-योग्य (इंटरनेट-एनेबल्ड) उत्पादनांची निर्मिती करण्यात दंग आहेत. फक्त स्मार्टफोनवर घरातील सर्व उपकरणं नियंत्रित करता येतील, असे स्वतःचे होमकिट ॲपल' कंपनीने तयार केले आहे.

गुगलने डिवाइसच्या जगात प्रत्येक ठिकाणी आघाडीसाठी पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. अशी प्रत्येक गोष्ट जी इंटरनेटने जोडली जाते, त्या क्षेत्रात आघाडीवर राहण्याचा गुगलचा प्रयत्न आहे. त्यामुळेच आता गुगलने नवीन ब्रिलो' ऑपरेटिंग सिस्टम बाजारात आणण्याची तयारी चालवली आहे. ही ऑपरेटिंग सिस्टम सर्वांत लहान असेल. त्यासाठी केवळ ३२ मेगाबाइट किंवा ६४ मेगाबाइट रॅम लागेल. इंटरनेट ऑफ थिंग्स डिवाइसमध्येही ही ऑपरेटिंग सिस्टम टाकता येणार आहे. नवीन ऑपरेटिंग सिस्टम अँड्रॉइड बॅनरखालीच बाजारात आणली जाणार आहे.

सॅमसंग'चे स्मार्टथिंग्स तर मायक्रोसॉफ्टने विंडोज आयओटी कोअर १० अशी संगणक प्रणालीच विकसित केली आहे.बिटलॉक' कंपनीने मोबाइल ॲपच्या माध्यमातून चावी शेअर करण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. त्यामुळे आपण जगात कुठेही असलो तरी फक्त मोबाईलने कुलूप उघडता येते. मँचेस्टर येथे सिटिव्हर्व' उपक्रमांतर्गत स्मार्ट बसथांबे (बसस्टॉप्स) बसविण्यात आले आहेत जिथे प्रवासी प्रतीक्षा करीत असल्यास बसचालकाला तत्काळ माहिती मिळते. तसेच बसथांब्यावरील स्वयंचलित दिवे फक्त प्रवासी असतानाच गरजेनुसार चालू-बंद होतात. इंग्लंडमध्ये ऑक्सफोर्ड येथे फ्लड नेटवर्क' कंपनी पूरसदृश्य काळात विविध ठिकाणांहून पाण्याच्या पातळीची प्रत्यक्षदर्शी माहिती यंत्रणेला पुरवते. त्यामुळे आपत्कालीन व्यवस्थेला तसेच पर्यावरण कंपन्यांना तात्काळ उपाययोजना करण्यासाठी माहितीचा उपयोग होतो. टीझेडओए' कंपनीने शहरातील हवेतील प्रदूषण, तापमान, आद्रता, हवेचा दाब, प्रकाश आणि अल्ट्राव्हायोलेट किरणांची तीव्रता मोजण्याचे तंत्रज्ञान विकसित केले आहे. क्रीडाक्षेत्रात आयओटी आधारित क्रिकेट बॅट, टेनिस रॅकेटचा वापर करून खेळाडू स्वतःच्या खेळाचे विश्लेषण करू शकतो व आपली कामगिरी सुधारू शकतो.

- किरणकुमार जोहारे

बोधकथा — एक तरी ओवी अनुभवावी...

कौरव आणि पांडव आश्रमात राहून शिक्षण घेत होते. एकदा त्यांच्या गुरूंना काही कामानिमित्त बाहेरगावी जायचे होते. जातांना त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना ते परत येईपर्यंत काही पाठांचा अभ्यास करण्यास सांगितले. पंधरा दिवसांनी गुरु परतले आणि प्रत्येकाने काय काय अभ्यास केला, याविषयी विचारणा करू लागले. प्रत्येक जण आपण कसा जास्तीतजास्त अभ्यास केला, याविषयी सांगू लागला. शेवटी धर्मराजाची पाळी आली. धर्मराज म्हणाला, गुरुजी, मी एका वाक्याचा अभ्यास केला. धर्मराजाच्या तोंडचे उत्तर ऐकताच गुरुजींना खूप राग आला; कारण धर्मराज हा त्यांचा अत्यंत आवडता आणि हुशार विद्यार्थी होता. ते ओरडले, काय रे, या सर्वांपेक्षा तू मोठा आहेस, बुद्धीमान आहेस आणि तरीसुद्धा तू केवळ एकाच वाक्याचा अभ्यास केला म्हणतोस ? तुला लाज वाटली पाहिजे.

धर्मराज शांतपणे म्हणाला, गुरुजी, माझा नाईलाज आहे; परंतु एवढ्या कमी काळात मी खरंच एक वाक्य शिकलो. गुरुजींचा पारा चढला. ते खवळले आणि म्हणाले, मूर्खा लेका, तू आळशीच नाहीस, तर निर्लज्ज आहेस. तरीही धर्मराज शांतच होता. जराही विचलित न होता तो म्हणाला, गुरुजी, माफ करा; पण मी खरोखरच एवढंच शिकलो. गुरुजींना राग आवरेना. त्यांनी रागाच्या भरात धर्मराजाच्या थोबाडीत मारायला सुरुवात केली, तरीही धर्मराज शांतच होता. त्याच्या तोंडावरचे भाव जरासुद्धा पालटले नव्हते.

आता मात्र गुरुजी वरमले. त्यांना वाटले की, धर्मराजाच्या म्हणण्यात काहीतरी तथ्य असले पाहिजे. ते म्हणाले, बाळ, तू कोणते वाक्य शिकलास, ते तरी सांग. धर्मराजाने आपली वही आणून दाखवली. तिथे लिहिले होते, कोणत्याही परिस्थितीत आपल्याला राग येऊ देऊ नये. या एका वाक्यासरशी गुरुजी आणि बाकी विद्यार्थी काय समजायचे, ते समजले. विनाकारण शिक्षा केल्याविषयी गुरुजींनी धर्मराजाची क्षमा मागितली.

तात्पर्य : नुसत्या अफाट ज्ञानापेक्षा थोडे शिकले, तरी चालेल; परंतु जे शिकू, ते कृतीत आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहेच, एक तरी ओवी अनुभवावी ।

वाणी संतांची — जगात खरे सुख नाही आणि दुःखही नाही

हल्ली लोकांचे हित करण्यासाठी जो तो झटत असतो, पण आपले स्वतःचे हित साधल्याशिवाय् दुसऱ्याचे हित आपण काय साधणार? ज्याला स्वतःला सुधारता येत नाही, तो दुसऱ्याला काय सुधारणार? त्यालासुद्धा अभिमानच आड येतो, कारण त्याला वाटते,आपण दुसऱ्याचे हित करून देऊ.' या अभिमानाने तो फुगलेला असतो. अहंकार जाण्यासाठी साधनच करावे लागते आणि ते साधन गुरू सांगत असतात. म्हणून त्याच्या आज्ञेप्रमाणे वागले म्हणजे आपले हित होते. ब्रह्म हे काही कुठे शोधायला जावे लागत नाही. ते आपल्या जवळच असते; पण ते दुसऱ्याने आपल्याला दाखवावे लागते. हेच काम सद्गुरू करीत असतात.



श्रीकृष्ण प्रत्यक्ष परब्रह्म, अवतार घेऊन वसुदेवाच्या पोटी आले, परंतु वसुदेव त्यांना आपला मुलगाच समजत होते तोपर्यंत, प्रत्यक्ष परमात्मा घरी असूनही ओळख पटली नाही. तेच, नारदांनी जेव्हा सांगितले की, श्रीकृष्णाला आपला मुलगा न समजता तो परब्रह्म आहे असे समजा म्हणजे तुमचे हित होईल,' तेव्हा खरी ओळख पटली. तसेच, राम अवतारी असूनही, वसिष्ठांनी जेव्हा सांगितले की, तूच प्रत्यक्ष परब्रह्म आहेस,' तेव्हाच त्याला ते ज्ञान झाले. आता हे जरी केवळ आपल्याला दाखविण्याकरिता असले, तरी त्याचा अर्थ हा की, गुरूने दाखविल्याशिवाय तो परमात्मा भेटत नाही. गुरू तरी काय सांगतात? नामस्मरण हेच साधन म्हणून ते सांगतात. ते दिसायला जितके सोपे तितकेच करायला कठीण असते; ते कठीण आहे म्हणून सोडून देऊ नये. आपण देवाला शरण जाऊन साधन करायला लागावे, म्हणजे ते करायला तो परमात्मा शक्ती देतो.

क्यूआर कोड वापरताना सावधान!

क्यूआर म्हणजेच क्विक रिस्पॉन्स. हा स्कॅन करून पेमेंट करण्याचा लोकप्रिय पर्याय आहे. त्याचा वापर सर्रास केला जातो. दुकानदार बिल भरण्यासाठी याचा वापर करतात. अगदी लहान विक्रेतेसुद्धा त्यांच्या ग्राहकांना क्यूआर कोड स्कॅन करून पैसे भरण्याचा किंवा पेमेंट करण्याचा पर्याय देतात. क्यूआर कोड वापरून पेमेंट करण्यासाठी ग्राहकाला लाभार्थी किंवा लाभार्थीच्या खात्याच्या तपशिलात जाण्याची गरज नाही आणि व्यवहाराचा बंदोबस्तदेखील जलद आहे. ग्राहकांच्या सोयीसाठी सर्व बँकिंग आणि ई-वॉलेट ॲप्स क्यूआर कोड वाचन करण्याचे सॉफ्टवेअर प्रदान करतात. क्यूआर कोड स्कॅन केल्यानंतर ग्राहक रक्कम प्रविष्ट करतो आणि पासवर्ड प्रविष्ट करून पेमेंट प्रमाणित करतो आणि रक्कम लाभार्थीच्या खात्यात अगदी सहज हस्तांतरित केली जाते. एवढेच नाही तर ग्राहक क्यूआर कोड जनरेट करू शकतो आणि तृतीय पक्षाला पाठवू शकतो आणि त्या क्यूआर कोडमध्ये नमूद केलेली रक्कम स्वीकारू शकतो.

क्यूआर कोड फसवणुकीबद्दल

१. क्यूआर स्कॅनिंग किंवा पेमेंट करण्यासाठी वापरला जातो, परंतु अनेक घटनांमध्ये असे आढळून आले आहे की फसवणूकदारांनी ते डिपॉझिट कन्फर्मेशन म्हणून सादर केले आहे. याची काही उदाहरणे : फसवणूक करणारे जङ्द सारख्या प्लॅटफॉर्मवर वस्तू विकणाऱ्यांशी संपर्क साधतात. यासाठी ते स्वत:ला सेकंड हँड वस्तू विक्रेते म्हणून दाखवतात आणि विक्रेत्याला मालाची तपासणी न करताच करार अंतिम करण्यास राजी करतात. विश्वास निर्माण करण्यासाठी फसवणूक करणारा सुरुवातीला विक्रेत्याच्या खात्यात एक छोटी टोकन रक्कम हस्तांतरित करतो आणि त्याला वाटाघाटीमध्ये गुंतवून ठेवतो. थकबाकी भरण्यासाठी ते विक्रेत्याला क्यूआर कोड पाठवतात आणि स्पष्ट करतात की हा क्यूआर कोड विक्रेत्याच्या खात्यात मिळालेल्या पेमेंटच्या पुष्टीकरणासाठी आहे. खरंतर हा क्यूआर म्हणजे पैसे मिळवण्यासाठी आणि त्याचप्रमाणे विक्रेता पासवर्ड टाकताच फसव्या मार्गाने त्याच्या खात्यातून पैसे कापले जातात. फसवणूक करणारा व्हॉट्सॲपद्वारे क्यूआर दुसऱ्या पक्षाला शेअर करतो आणि कोड स्कॅन केल्यावर लगेच दुसऱ्या पक्षाच्या खात्यात पैसे जमा केले जातील, असे सांगतो. निष्पाप लोकांना वाटते की त्यांच्या खात्यात पैसे येतील, पण उलट घडते आणि ते लोक सायबर गुन्हेगारीचे बळी ठरतात.

२. OLX, Quikr आणि सोशल मीडिया चॅनेलवर फसवणूक करणारे विक्रेते म्हणून लष्कर अधिकारी, बीएसएफ, सीआयएसएफ किंवा कोणत्याही ब्रँड नेमचा वापर करून स्वत:चा वेश करतात. त्यानंतर ते खरेदीदारांना कलेक्ट रिक्वेस्ट वापरून आगाऊ पेमेंट करण्यास सांगतात आणि प्रदान केलेल्या क्यूआर कोडवर पैसे पाठवण्यास सांगतात, परंतु त्या क्यूआर कोडमध्ये मोठी रक्कम दिलेली असते. खरेदीदार हे विक्रेत्याच्या हेतूंपासून अनभिज्ञ असतात आणि त्याची विनंती मान्य करण्याची चूक करतात.



३. अनेक साईट्सवर फसवणूक करणारे भाडेकरू म्हणून लष्कर अधिकारी, बीएसएफ, सीआयएसएफ स्वत:चा वेश करतात आणि फ्लॅट किंवा घर भाड्याने मागतात. त्यानंतर ते सुरुवातीला घरमालकाच्या खात्यात एक छोटी टोकन रक्कम हस्तांतरित करतो आणि नंतर संपूर्ण घरभाडे भरण्यासाठी ते घरमालकांना क्यूआर कोड पाठवतात आणि स्पष्ट करतात की हा क्यूआर कोड घरमालकाच्या खात्यात मिळालेल्या पेमेंटच्या पुष्टीकरणासाठी आहे, तर क्यूआर म्हणजे पैसे मिळवण्यासाठी आणि त्याचप्रमाणे विक्रेता पासवर्ड टाकताच फसव्या मार्गाने त्याच्या खात्यातून पैसे कापले जातात. फसवणूक करणारा व्हॉट्सॲपद्वारे क्यूआर दुसऱ्या पक्षाला शेअर करतो आणि कोड स्कॅन केल्यावर लगेच दुसऱ्या पक्षाच्या खात्यात पैसे जमा केले जातील, असे सांगतो. निष्पाप लोकांना वाटते की त्यांच्या खात्यात पैसे येतील, पण उलट घडते आणि ते लोक सायबर गुन्हेगारीचे बळी ठरतात. तसेच अनेकदा घरमालकांना स्वतःची आयडी, आधार कार्ड, पॅनकार्ड पाठवतात तसेच घरमालकालादेखील त्याचे आयडी, आधार कार्ड, पॅनकार्ड ओळख पटविण्यासाठी पाठविण्यास सांगतात आणि घरमालकाची कागदपत्रे मिळाल्यानंतर त्या घरमालकाच्या नावाने काही प्रकरणात फसवणूक करतात.

४. फसवणूक करणारे बनावट वेबसाईट तयार करून काही आकर्षक सौदे देतात, जे खरेदीदारांना आकर्षित करतात आणि क्यूआर कोडद्वारे फसव्या पेमेंट स्वीकारतात.

फसवणूक कशी टाळावी?

जर कोणी तुम्हाला तुमच्या खात्यात पैसे जमा करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करण्यास सांगत असेल, तर तो फसवणुकीचा कॉल आहे. त्यावर विश्वास ठेवू नका. - फक्त ते क्यूआर कोड स्कॅन करा जे पूर्णपणे विश्वासार्ह आहेत आणि तुम्हाला माहीत आहे की ते कोणी तयार केले. - अज्ञात लाभार्थीकडून संकलित विनंत्या कधीही मान्य करू नका. - जर तुम्ही एखादा क्यूआर कोड स्कॅन केला जो तुम्हाला वेब पेजवर घेऊन जाईल आणि तुमची वैयक्तिक माहिती जसे की नाव, लॉगिन आयडी, पासवर्ड, पत्ता इत्यादी विचारेल तर टाळा. -तुमच्या खात्यात पैसे मिळवण्यासाठी कोणत्याही पिनची आवश्यकता नाही. फसवणूक करणारे क्यूआर कोड पाठवून ग्राहकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. - क्यूआर कोडमध्ये काय लपलेले आहे हे शोधण्यासाठी क्यूआर कोड कधीही स्कॅन करू नका. - सार्वजनिक क्यूआर कोड वापरताना सावधगिरी बाळगा. कारण सायबर गुन्हेगार अपराधी त्यांच्या खात्यात पैसे मिळविण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या क्यूआर कोडला खऱ्या क्यूआर कोडच्या जागी टाकू शकतात.

- योगेश हांडगे

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

सोलापुरात 'श्रेय'वादाच्या राजकारणाचा भन्नाट हंगामा; हुतात्मा पुतळा चौक सुशोभीकरण कामाचे फुटले दोनदा नारळ

- भाजपवाल्यांची राष्ट्रवादीवर कुरघोडी
- हुतात्मा पुतळा चौक परिसराच्या सुशोभीकरणाचे काही तासात दोन वेळा भूमिपूजन
- 'हम भी कुछ कम नही' हे दिले दाखवून

सुराज्य/सोलापूर

श्रेयवादाचे राजकारण सोलापूरमध्ये तसे नवीन नाही. आजवर अनेकवेळा असे राजकारण झाले. तसे राजकारण रंगलेसुध्दा. असाच श्रेयवादाच्या राजकारणाचा भन्नाट हंगामा मंगळवारी दिसून आला. या प्रकरणात भाजपने महापालिकेला हाताशी धरून राष्ट्रवादीवर कुरघोडी केल्याचे लपून राहिले नाही. ही कुरघोडी करताना 'हम कुछ कम नही' हम तो है सरकार, हे ठकावून सांगत, शहरातील हुतात्मा चौक परिसरातील कामाचे भूमिपूजन राष्ट्रवादीने सुरुवातीला काही तासांपूर्वी केले असतानादेखील भाजपने पुन्हा याच कामाचे भूमिपूजन केले. या धडामोडींमधून सोलापुरात पुन्हा 'श्रेय'वादाचे नारळ दोन वेळा फुटले.

त्याचे झाले असे की, जिल्हा नियोजन समितीच्या निधीमधून हुतात्मा पुतळा चौक परिसराच्या सुशोभीकरणाचे काम महापालिकेने हाती घेतले आहे.

जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते भूमिपूजन ठेवण्यात आलेले आहे, याची कुणकुण राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना लागताच, मंगळवारी सकाळी राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि धनगर समाजाचे कार्यकर्ते यांनी संयुक्तरीत्या मिळून भूमिपूजन कार्यक्रम उरकला. राज्यातील तत्कालीन महाविकास आघाडी सरकारमधील पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून या कामाला मंजुरी दिलेली आहे, तेव्हा भाजपने कार्यक्रम करून फुकटचे श्रेय लाटू नये, असे सांगत राष्ट्रवादीचे कार्यकर्ते आणि धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी भूमिपूजनाचे नारळ फोडले. कामाचे भूमिपूजन करून आयते श्रेय लाटण्याच्या भाजपच्या राजकारणाचा निषेध नोंदवत कार्यक्रम पार पाडण्यात आला. दरम्यान पुढच्या अवघ्या काही तासातच भाजपवाल्यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या हस्ते याच कार्यक्रमाचे भूमीपुजन करून घेतले. हे करत त्यांनी राष्ट्रवादीवर कुरघोडी करत, 'हम भी कुछ कम नही', हम है सरकार याचा प्रत्यय आणून दिला.

राष्ट्रवादीवाल्यांचे हे आक्षेप...

हुतात्मा पुतळा चौक परिसर सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन करण्यावर राष्ट्रवादी आणि धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी आक्षेप नोंदवले. ज्या चार हुतात्म्यांच्या पुतळा ठिकाणच्या परिसरात सुशोभीकरण होत आहे, त्याच्या भूमिपूजनाला हुतात्म्यांच्या वारसांना कोणालाही बोलावले नाही, त्यांचा विसर पडला. महापालिकेने कार्यक्रम पत्रिकेत वारसांची नावे घेतली नाहीत. या शिवाय या कामाला पुरातत्त्व विभागाची कायदेशीर परवानगी घेतलेली नव्हती.

नागपूर येथे स्वाभिमानी आर.जी. कंपनीचे लेझीम

सुराज्य/सोलापूर : दिक्षाभुमी नागपूर येथे स्वाभिमानी आर. जी. कंपनीचे लेझीम ताफा पिंटु ढावरे यांच्या नेतृत्व खाली काढण्यात आलाफ ६६ व्या धम्मचक्र परिवर्तन दिनानिमित्तआर. जी. मागासवर्गीय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सोलापूर संस्थापक अध्यक्ष पिंटू ढावरे प्रविण गायकवाड, प्रमोद नागटिळक, बंटी तळभंडारे, संजू गायकवाड, भैय्या सांवत, श्रीकांत सांवत, गौतम बनसोडे, बबलू ढावरे, तुषार जौंजट, सिध्दांत रणखांबे, आर्दश सरतापे, सुधीर बनसोडे, शंशी माने, संदेश गवळी, शुभम गायकवाड, अजय गायकवाड, दिंगबर वाघमारे, राजाभाऊ चव्हाण, विशाल गायकवाड, श्रावण सरवदे, सिध्दांत मसलखांब, आकाश बडेकर, अजय कसबे, दिपक कोप्पल, कुणाला उडाणशिवे, बबन सोनवणे, अतिश मस्के, सुरज गायकवाड, दिपक रणदिवे, सिध्दांत सरवदे, सिधू कोळी, सुमीत गायकवाड, कृष्णा सांबळे, धीरज यादव उपस्थित होते.

सोलापूर स्पोर्ट्स अकॅडमीचे मत्सोगी-डो स्पर्धेत यश

सुराज्य/सोलापूर : राज्यस्तरीय मत्सोगी-डो स्पर्धेत सोलापूर स्पोर्ट्स अकॅडमीने घवघवीत यश संपादन केले. अकादमीच्या खेळाडूंनी २ सुवर्ण आणि ३ रौप्य पदकांची कमाई केली. राष्ट्रीय मत्सोगी-डो फेडरेशन, महाराष्ट्र मत्सोगी-डो असोसिएशन आणि सोलापूर जिल्हा मत्सोगी-डो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने इंनडोर स्टेडियम, कुमठा नाका येथे २ ऑक्टोबर २०२२ रोजी राज्यस्तरीय मत्सोगी-डो स्पर्धा घेण्यात आल्या. या राज्यस्तरीय स्पर्धेत सोलापूर स्पोर्ट्स अकॅडमी, सुंदरम नगर सोलापूर येथील खेळाडूंनी २ सुवर्ण व ३ रौप्य पदकांची कमाई केली. यामध्ये १२ वर्षा खालील गटात विपुल रेऊरे (-३० कि.), १४ वर्षाखालील गटात अथर्व पवार (-३५ कि.), १७ वर्षाखालील गटात राघवेंद्र वैद्य (-४५ कि.), विवेक शिंदे (+७५ कि.) गटात सुवर्ण पदक पटकावले. या यश संपादन केलेल्या खेळाडूंचे गोवा येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विजयी खेळाडूंचे सोलापूर स्पोर्ट्स अकॅडमीचे संचालक धनंजय धेंडे, आयडियल इंग्लिश मीडियम स्कूल स्कूलचे चेअरमन सचिन चव्हाण, आदर्श शिक्षक वैभव कुलकर्णी यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

बापट यांचे खेळाडूंचे क्रीडा मानसशास्त्रावर आज व्याख्यान

सुराज्य/सोलापूर : सोलापूर शहर व जिल्हा क्रीडा फेडरेशन व रोटरी क्लब ऑफ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ऑस्ट्रिया येथील क्रीडा मानसशास्त्रज्ञ गंधाली बापट यांचे गुरुवारी ६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पाच वाजता व्याख्यान होईल. नवीपेठ येथील शिवस्मारक सभागृहात 'खेळाडूंचे क्रीडा मानसशास्त्र' या विषयावर हे व्याख्यान होईल, असे जिल्हा क्रीडा फेडरेशनचे अध्यक्ष डॉ. पुरणचंद्र पुंजाल व रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष कालिदास जाजू यांनी कळविले आहे. गंधाली या मूळच्या सोलापूरच्या असून त्यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण सोलापुरात झाले आहे. ते उत्तम क्रिकेट, योगा खेळाडू आहेत. ते आपल्या व्याख्यानात खेळाचे मानसशास्त्र म्हणजे काय? क्रीडा मानसशास्त्राचे महत्व, क्रीडा मानसशास्त्रामुळे खेळातील आधुनिक तंत्रज्ञान कसे आत्मसात करता येतात, अशा अनेक मुद्यांवर ते मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या मार्गदर्शनानंतर खेळाडूंच्या प्रश्नोत्तरांवर चर्चाही केली जाणार आहे. सर्व खेळाडू, क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, क्रीडा संचालक व क्रीडा प्रेमी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा फेडरेशनचे सचिव महेश गादेकर व रोटरी क्लब सोलापूरचे सचिव सुरज तापडिया यांनी केले आहे.

बेकायदेशीररित्या जनावरांची वाहतूक; एकावर गुन्हा

सुराज्य/सोलापूर : जनावरे कत्तल करण्याच्या उद्देशाने व बेकायदेशीररित्या जनावरांना पिकप क्रमांक एम. एच. १३. डी. क्यू. ०६०४ या वाहनात ४ गायी दाटीवाटीने घालून व कोणत्याही प्रकारचा वाहतुकीचा परवाना नसताना बाळे ब्रिजलगत वाहतूक करताना मिळून आला आहे. हि घटना दि. ४ ऑक्टोबर रोजी रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलीस नाईक हिदायतुल्ला वजुद्दिन मुलाणी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शब्बीर करीम काझी (रा. नवनाथ नगर, मजरेवाडी) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक घुगे हे करीत आहेत.

संभाजी आरमारचा दसरा दरबार जल्लोषात

सुराज्य/सोलापूर

संभाजी आरमारचा १५ वा दसरा दरबार मोठ्या उत्साही वातावरणात तुडुंब भरलेल्या सभागृहात जल्लोषात साजरा झाला.

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृह येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या मूर्तीचे आणि शस्त्रपूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी महापालिकेच्या सहा. आयुक्त पुष्पगंधा भगत, महावितरणचे कार्यकारी अभियंता चंद्रकांत दिये, मुख्य लेख व वित्त अधिकारी उत्तम सुर्वे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ. सुनील शेवाळे, ॲड. गणेश पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत बहारदार दसरा दरबार संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे हे होते. प्रसंगी सोलापूरच्या स्वातंत्र्यव लढ्यामध्ये प्राणार्पण केलेले हुतात्मा मलप्पा धनशेट्टी यांचे पणतू शिवकुमार धनशेट्टी यांचा मानपत्र देऊन विशेष सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शशिकांत शिंदे, सागर ढगे, राज दवेवाले, राज जगताप, रोहित मनसावाले यांची निवड करण्यात आली. सूत्रसंचालन गिरीश देवकते यांनी तर प्रास्ताविक आणि आभार प्रदर्शन तुकाराम जाधव यांनी केले. याप्रसंगी शिवाजी वाघमोडे, प्रकाश डांगे, गजानन जमदाडे, अनंतराव नीळ, राजेश पाटील, सागर संगवे, सचिव राहुल यमगर, प्रमोद जगताप, ज्ञानेश्वर डोंबाळे, राजशेखर बोरगाव, अमित कदम, ओम भोसले, सतीश भोसले, प्रा. मल्लिकार्जुन परळकर आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

अज्ञात चोरट्याने पळवली दुचाकी

सुराज्य/सोलापूर

जोडभावी पेठ पोलीस ठाण्यातील भुलाभाई चौक परिसरातून चोरट्याने दुचाकी (एमएच १३, ऐजी ९४९२) चोरून नेल्याची फिर्याद रफिक महेबूबसाब अलमेलकर (रा. सोमवार पेठ) यांनी जोडभावी पेठ पोलिसांत दिली. त्यांची दुचाकी २० सप्टेंबर रोजी सकाळी आठ ते रात्री साठेआठ या वेळेत चोरीला गेली आहे.

महिलेची पर्स कापून मोबाईल पळवला

रूपाभवानी मंदिरात दर्शनासाठी गेल्यानंतर नरेंद्र तिरूपती अलकुंटे (रा. शांती नगर, मड्डी वस्ती, भवानी पेठ) यांची पत्नी व मुले तेथील दुकानातून कानातील व बांगड्या घेत होते. त्यावेळी गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने नरेंद्र अलकुंटे यांच्या पत्नीजवळील पर्स कशानेतरी कापून त्यातील मोबाइल लंपास केला. मंगळवारी रात्री सव्वानऊच्या सुमारास ही चोरी झाली, अशी फिर्याद अलकुंटे यांनी जोडभावी पेठ पोलिसांत दिली.

वेळापूर येथे दुर्गाष्टमी कार्यक्रम संपन्न

सुराज्य/वेळापूर

अकलूज प्रखंडातील वेळापूर येथे दुर्गाष्टमीचा कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाची सुरुवात त्रिवार ओमकार एकात्मता मंत्र, विजय महामंत्र, दुर्गा पूजन, श्रीराम भारमाता शस्त्र पूजन करून करण्यात आली.

यानंतर मान्यवरांचा परिचय करून देण्यात आला. पिंपरी चिंचवड दुर्गा वाहिनी संयोजिका कु. हर्षदाताई धुमाळ यांनी महिला अबला नाही तर सबला आहे विश्व हिंदू परिषद, दुर्गा वाहिनी, मातृशक्ती बद्दल मार्गदर्शन केले. यानंतर पंढरपूर जिल्हा मातृशक्ती प्रमुख सौ. रेखाताई टाक व सौ. शिल्पाताई चौंडवार यांनी महिषासुरमर्दिनी स्त्रोत्र पठण केले. अमरजा हिने श्रीसूक्त म्हटले यानंतर मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक घेण्यात आले. निंयुध्दा दंड प्रात्यक्षिक मानसी, श्वेता, अमरजा यांनी केले. तलवार प्रात्यक्षिक जिजाई जगदिश कुलकर्णी हिने करून दाखवले. रायफल शूटिंग चे प्रात्यक्षिक कु. रत्नाताई साळे यांनी दाखवले. कार्यक्रमाच्या शेवटी दुर्गा माता, भारतमाता यांची आरती मातृशक्ती यांचे हस्ते करण्यात आली. उपस्थित सर्व महिलांचा हाळदी कुंकू समारंभ घेण्यात आला. यावेळी नीलिमाताई माने देशमुख, वैष्णवी माने देशमुख यांनी सर्व महिलांची ओटी भरली. कार्यक्रमासाठी महिला मोठ्या संख्ने उपस्थित होत्या. कार्यक्रमाला सोलापूर विभाग मातृशक्ती प्रमुख भाग्यश्री लिहिणे, सोलापूर विभाग सत्संग प्रमुख मालती गंभीर, पंढरपूर जिल्हा उपाध्यक्ष रमाकांत देशपांडे, पंढरपूर जिल्हा मंत्री डॉ. जयसिंह पाटील, पंढरपूर जिल्हा मातृशक्ती प्रमुख रेखाताई टाक, शिल्पाताई चौंडवार आदी उपस्थित होते.

सूर्याजी पिसाळ सारख्या प्रवृत्ती ठेचण्याची गरज : जाधव

शिवाजी प्रशाला दसरा महोत्सव

सुराज्य/सोलापूर

छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात सूर्याजी पिसाळ यांच्या फितूरपणामुळे रायगड मोघलाच्या हाती गेला आजही समाजात पिसाळ सारख्या प्रवृत्ती शिल्लक असून त्यावेळेस ठेचून काढण्याची गरज असल्याचे प्रतिपादन इतिहास अभ्यासक प्रा. ज्ञानेश्वर जाधव यांनी केले.

छत्रपती शिवाजी प्रशालेत बुधवार विजयादशमीनिमित्त मराठा समाज सेवा मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे आयोजित दसरा महोत्सव निमित्त या व्याख्यानात प्रा. जाधव बोलत होते. 'शिवकालीन समाजातील सूर्याजी पिसाळ यांचे स्थान ' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानि संस्थेचे उपाध्यक्ष विनायकराव पाटील हे होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष मनोहर सपाटे, सचिव नामदेव थोरात, संचालक महादेव गवळी, अशोक चव्हाण, सूर्यकांत इंगळे, शिवदास चटके, सुनीता साळुंखे, रेखा सपाटे, आदींची प्रमुख उपस्थित होते. प्रारंभि स्वागत व व प्रास्ताविक सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर सपाटे यांनी केले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष पाटील यांनी गेल्या अनेक वर्षापासून मनोहर सपाटे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था चांगली प्रगती करीत असल्याचे सांगून समाजविघातक प्रवृत्तीवर ही त्यांनी मत व्यक्त केले. या कार्यक्रमास पांडुरंग शिवकर, के. पी जाधव. जगदीश सुरवसे. कुमार गायकवाड, हनुमंत बेसुळके, माणिक प्रभू मुळे, हेमंत पिंगळे, राजेंद्र अवताडे, तानाजी माने, मारुती गोरे, सुजाता जूगदार, अनिल बारबोले, उषा गोखले, दत्ता भोसले, आदी मान्यवर उपस्थित होते, सूत्रसंचालन सारिका महामुनी यांनी केले तर आभार प्रा. महेश माने यांनी मानले.

सपाटे व्यासपीठावरून थेट रुग्णालयात

मराठा समाज सेवा मंडळातर्फे आयोजित दसरा महोत्सवास उपस्थित संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने तात्काळ त्यांना व्यासपीठावरून थेट भैय्या चौकातील श्रीराम हार्ड केअर सेंटरमध्ये उपचारासाठी दत्ता भोसले यांनी ताबडतोब दाखल करण्यात आले. त्यामुळे काही काळ वातावरण सुन्न झाले होते.

अकलूज येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन

सुराज्य/अकलूज : धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या व अशोक विजयादशमी दिनाच्या निमित्ताने अकलूज येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या ठिकाणी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते धम्मध्वजारोहण करून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तद्नंतर सामुहिक वंदना घेण्यात आली. यावेळी माजी सरपंच विठ्ठलनाना गायकवाड, अकलूज नगर परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दयानंद गोरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) जिल्हा युवक कार्याध्यक्ष किरण धाईंजे, राजेंद्र काकडे, नाशिक आबा सोनवणे, विशाल मोरे, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, प्रवीण लोंढे सर, मनोहर कोळसे, पत्रकार गौतम भंडारे, संदीप गायकवाड, संदीप खंडागळे, महावीर खंडागळे आणि बहुसंख्येने समाजबांधव उपस्थित होते.

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त पी. बी. ग्रुपची जल्लोषात मिरवणूक

सुराज्य/सोलापूर

प्रबुध्द भारत तरुण मंडळ (पी. बी. ग्रुप) च्या वतीने मार्गदर्शक माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली ६६ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त जल्लोषात बहाद्दर लेझीम डाव सादर करत भव्य मिरवणूक काढण्यात आली.

बुधवारी दुपारी ३ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वरुड पुतळ्यास मान्यवरांच्या उपस्थितीत अभिवादन करून प्रबुध्द भारत तरुण मंडळाच्या वतीने जल्लोषात बहाद्दर लेझीम डाव सादर करत भव्य मिरवणूक प्रारंभ करण्यात आला. मिरवणुकीच्या सुरुवातीला सोलापूरचे पोलीस आयुक्त राजेंद्र माने, पालिका आयुक्त मा. पी. शिवशंकर यांच्या हस्ते मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त दीपक आर्वे, फौजदार चावडी पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील, माजी गटनेते तथा प्रबुध्द भारत तरुण मंडळाचे प्रमुख मार्गदर्शक आनंद चंदनशिवे माजी सभापती गणेश पुजारी, एस के फाउंडेशनचे संस्थापक रविकांत कोळेकर, प्रबुध्द भारत तरुण मंडळाचे प्रमुख गौतम चंदनशिवे, सामाजिक कार्यकर्ते श्रीमंत जाधव, प्रबुध्द भारत तरुण मंडळाचे अध्यक्ष संदीप कापुरे, सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सोनवणे, पी. बी ग्रुप चे सल्लागार विशाल मस्के हृदयनाथ मोकाशी आदींच्या प्रमुख उपस्थितीत मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेकॅनिक चौक, सरस्वती चौक, चार हुतात्मा चौक, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक अशी काढण्यात आली.

यावेळी भारत बाबरे, अभिजीत कापुरे, नितीन बनपट्टे, संजय इंगळे, श्रीकांत वाघमोडे, अमित माने, आदित्य चंदनशिवे, धीरज वाघमोडे, नाना कापुरे, विजय इंगळे, संजय सरवदे, बंटी माने, सुभाष साके, अंबादास कापुरे, सुनील गायकवाड, पिंटू वाघमोडे, ज्ञानेश्वर कांबळे, गौतम इंगळे, भीमा इंगळे, विशाल गाडे, अजय इंगळे, करण वडवे, अमोल कुंदुर, प्रवीण शिंदे, शेखर कांबळे, बालराज जाधव, गणेश डोळसे, धोंडीबा कापुरे, सुमित जाधव, अमित बनसोडे, प्रथमेश इंगळे, राजू साबळे, आशुतोष इंगळे, साईनाथ मस्के, मंगेश अंकुश, मिथुन बनसोडे, अमोल बनसोडे, गणेश डोळसे, विजय इंगळे, प्रमोद शिंदे, अंबादास कापुरे, धोंडीबा कापुरे, महेश शिंदे, मनोज थोरात, अभिजीत गायकवाड, सुमित कापुरे, अमर सुरवसे आदी उपस्थित होते.

फुलांचा देखावा ठरला आकर्षण

या मिरवणुकीत एल. ई. डी. स्क्रीन द्वारे प्रबुध्द भारत तरुण मंडळाचे बहाद्दर लेझीमचे डाव सादर करण्यात आले. त्याचप्रमाणे प्रबुध्द भारत तरुण मंडळच्या वतीने लेझीमडावा सोबत पारंपरिक वाद्य त्याचप्रमाणे पारंपरिक आर्टिफिशियल फुलांचा देखावा (मोर) करण्यात आला. ही मिरवणूक पाहण्यासाठी शेकडो नागरिकांची गर्दी झाली होती.

Blank
Blank
Blank

अनगरकर पाटील परिवार लटकला

ना राष्ट्रवादीत बस्तान, ना भाजपात प्रवेश

- पाटील परिवाराच्या भाजप प्रवेशावर खुद्द श्रेष्ठींचा येईना निरोप
- बारामतीकर पवारही दुरावू लागले
- पाटील सुपुत्रांचे राजकीय भवितव्य टांगणीला
- मोहोळ तालुक्याच्या राजकारणाबद्दल संभ्रम कायम

सुराज्य/शिवाजी भोसले

मोहोळ तालुक्याचे राजकारण कोणत्या ट्रॅकवर पोहचणार याबद्दल ठोसपणे सांगणे सध्या तरी सांगणे मुश्कील बनले आहे. या तालुक्याच्या राजकारणाबद्दल प्रचंड संभ्रम कायम आहे. माजी आमदार राजन पाटील परिवार मध्यल्या मध्येच लटकल्याचे वास्तव आहे.

या परिवाराचे बस्तान राष्ट्रवादीत पहिल्यासारखे कायम आहे, असे धाडसाने सांगणे अवघड आहे, तर त्यांचा भाजप प्रवेश निश्चित झाला, आहे हे सांगणेदेखील सोपे राहिलेले नाही, हे खरेखुरे सत्य आहे. या सगळ्या घडामोडी आणि त्या पार्श्वभूमीवरची, सगळी उठलेली घालमेल यामध्ये पाटील परिवाराचे सुपुत्र बाळराजे आणि अजिंक्यराणा पाटील यांचे राजकीय भवितव्य टांगणीला लागले आहे. मुख्य म्हणजे, भाजप प्रवेशच लटकल्याने खुद्द पाटील परिवारासह त्यांच्या समर्थकांची चुरचुर उठली आहे. नेमके काय होणार? याचा कोणताच अंदाज बांधता येत नसल्याने, वेट ॲन्ड वॉच म्हणजे थांबा आणि पहा असाच प्रकार या तालुक्यात राजन पाटील परिवार पर्यायाने राष्ट्रवादीच्या बाबतीत आहे.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, पाटील परिवाराच्या भाजप प्रवेशावर, महाराष्ट्राचे देवेंद्र तथा राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे चर्चा झाली खरी, पण प्रत्यक्ष प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर, खुद्द फडणवीस यांचा पाटील परिवाराला कोणताच निरोप आलेला नाही. किंबहुना फडणवीस यांच्याशी अनगरकर पाटील पिता - पुत्रांचा संवाद होताना दिसत नाही. फडणवीस तिकडे गप्प आहे, अनगरकर इकडे चिडिचूप अशी खरीखुरी परिस्थिती आहे.

बाळराजेंच्या मागणीचा भाजपा पुढे पेच

भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाटील पिता - पुत्राची पक्ष प्रवेशावर बैठक झाली होती, या बैठकीत युवा नेते आणि लोकनेते कारखान्याचे अध्यक्ष बाळराजे पाटील यांनी विधान परिषदेच्या आमदारकीचे सिंहासन देण्याची मागणी केली होती, हे सिंहान देण्यावरूनच भाजप पेचात असे या पक्षाच्या मुंबई स्थित वरिष्ठ नेत्याने 'दै. सुराज्यला' सांगितले. विधान परिषदेच्या कोट्यातून बाळराजेंना आमदारकी देण्याचा विषय होण्यापूर्वी भाजपने गोळा बेरजेच्या राजकारणाचा विचार करता, अन्य काही नावे डोळ्यासमोर ठेवली आहेत, त्यामुळे बाळराजेंना लगेच विधान परिषदेची आमदारकी देणे कसे शक्य होईल? याची पडताळणी करण्यात आल्याने खुद्द देवेंद्र फडणवीस यांनी अनगरकर पाटील परिवाराचा भाजप प्रवेशाचा विषय थोडा बाजूला ठेवल्याची माहिती समोर आली आहे. शिवाय भाजपला महाराष्ट्रात अजूनही अच्छे दिन येणार आहेत, अशा परिस्थितीत राष्ट्रवादीचा नेता पक्षात घेऊन त्यांना भाजपच्या कोट्यातून कशाला आमदारकी द्यायची? हादेखील विचार भाजपच्या गोटात पाटील परिवाराच्या प्रवेशावरून आहे.

बारामतीकरांपासून अनगरकर अधांतरी झाले का?

बारामतीकर पवार परिवारापासून अनगरकर पाटील हे अधांतरी झालेत का? त्यांच्यामध्ये जिव्हाळ्याचे सख्य राहिले आहे का? ते एकमेकांना दुरावलेत का? हा मुद्दा अधोरेखित आहे. उमेश पाटील यांच्या नेतृत्वाला वैतागण्याच्या मुख्य कारणासह अनगरकर पाटील सुपुत्रांना भाजपमध्ये आपले भविष्यातील राजकीय भवितव्य उज्वल वाटते, त्यातूनच त्यांनी भाजपशी जवळ साधली होती, देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पक्ष प्रवेशाची चर्चा केली होती. या संदर्भात मोठी गहजब होताना, पाटील परिवार हा राष्ट्रवादी पक्ष सोडत असल्याच्या चर्चेला उधाण आले होते. खुद्द राजन पाटील यांनी तशा आशयाची वक्तव्ये केली होती. त्यावर बारामतीकर पवारांनी पाटील पिता - पुत्राची समजूत काढत, उमेश पाटील यांना थोडे संयमाने घेण्याबद्दल सांगितले होते. त्यावर उमेश पाटील हे काही दिवस शांत होते. अशातच उमेश पाटलांच्या हाती आयते कोलीत मिळाले. याच कोलित्याच्या आधारे उमेश पाटील यांनी अनगरकर पाटलांचा करेक्ट कार्यक्रम केला. अनगरकर पाटील यांनी बारामतीकरांचे नेतृत्व झिडकारल्याचे पुरावे बारामतीकर पवारांना दिले. भाजप प्रवेशासंदर्भात अनगरकर पाटील यांची देवेंद्र फडणवीस यांच्याकडे झालेली बोलणी आणि त्यावर पुन्हा अनगर यांनी पवारांचे नाकारलेल्या नेतृत्वाचे पुरावे यावरून अनगरकर हे बारामतीकरांपासून अधांतरी झालेत, त्यांच्यात दुरावा येणे साहजिकच आहे असे म्हटले जाते.

अनगरकर पाटलांच्या निष्ठेवर प्रश्नचिन्ह, उमेश पाटलांना रसद

अनगरकर पाटील परिवाराने यापूर्वीदेखील भाजपात प्रवेश करण्यासाठी हालचाली केल्या होत्या. त्यांच्या या हालचाली बारामतीकरांना माहिती झाल्या होत्या, त्यावेळेसच त्यांच्या राष्ट्रवादी पर्यायाने बारामतीकरांच्या निष्ठेवर प्रश्नचिन्ह आले होते. तेव्हापासून शरद पवारांनी अनगरकर पाटील परिवाराकडे थोडासा कानाडोळा केला होता, त्यानंतर मागच्या काही दिवसांपूर्वी तर अनगरकरांनी वेगळी वक्तव्ये करत, भाजप प्रवेशासाठी देवेंद्र फडणवीस यांच्याकडे बोलणी केली. यातून बारामतीकरांनी अनगरकरांच्याबद्दल जे काही ओळखायचे होते, ते ओळखले आणि त्यातूनच अनगरकर पाटील यांना पर्यायी तगडे नेतृत्व म्हणून उमेश पाटलांना बारामतीकर पवार काका - पुतण्याने जोरदार रसद पुरवली आहे. यातून उमेश पाटलांचा अश्व अनगरकरांच्या विरोधात उसळता राहतोय.

अनगरकरांचे होणार काय?

भाजपात प्रवेश होण्यापूर्वीच, बारामतीकरांचे नेतृत्व नाकारल्याने अनगरकर पाटलांचे बस्तान राष्ट्रवादीत अवघड झाले. जिथे खुद्द नेतृत्वच नाकारले, तिथे पवार परिवाराची पर्यायाने राष्ट्रवादीची साथ अनगरकरांना कशी मिळणार हा मुद्दा ? दुसरीकडे आम्ही सांगेल, त्याला भाजपची मोहोळ विधानसभेची उमेदवारी द्या, आम्ही सांगेल तोच मोहोळचा आमदार होणार, आम्हाला लगेच विधान परिषदेची आमदारकी ही, बाळराजे पाटील यांनी भाजपकडे केलेल्या या मागण्यावर भाजपकडून म्हणजे देवेंद्र फडणवीस यांच्याकडून प्रतिसाद येताना दिसत नाही, या टप्प्यावर भाजपमधील प्रवेश थांबला. शिवाय अत्यंत महत्त्वाचे म्हणजे, राजन पाटील परिवाराचा भाजपात प्रवेश झाला तरी, मोहोळ तालुक्यातील कोणतेही निर्णय हे येथील पक्षाचे निष्ठावंत संजय क्षीरसागर यांना विचारूनच घेतले जातील, असे खुद्द फडणवीस यांनी सांगितले, त्यामुळे भाजपात प्रवेश झाला तरी अनगरकर हे तालुक्याचा निर्णय घेताना, राष्ट्रवादीप्रमाणे हुकमी राजे असणार नाहीत. नक्षत्र प्रकरणाचा विषय तर आता न्यायालयात आहे, तिथे भाजपचा वा कोणाचा हस्तक्षेप चालणार नाही. लोकनेते साखर कारखाना खासगी करण्याचा विषय तर उमेश पाटलांच्या मुख्य अजेंड्यावर आहे, अनगरकरांचा भाजपात प्रवेश झाला, तर राजकीय हाडवैरी विजयराज डोंगरे हे तिथे टरसल द्यायला आहेतच. हे सगळे लक्षात घेता, अनगरकरांची वाट ना राष्ट्रवादीत सोपी सरळ नाही ना भाजपातसुध्दा नाही.

कार्यकर्त्यांमध्ये मात्र असे झाले...

मोहोळ तालुक्यात राष्ट्रवादी आणि भाजपा यापेक्षा भाजप आणि अनगरकर पाटील यांच्यामध्ये विळी- भोपळ्याप्रमाणे राजकीय हाड वैर. पण अनगरकर पाटील हे भाजपच्या गोटात येताहेत, हे कळाल्यानंतर या पक्षातील सर्वांनी नरमाईची भूमिका घेतली, तह करून सामंजस्याने राहण्याची मानसिकता केली, तेच राष्ट्रवादी त्यापेक्षाही अनगरकर पाटील समर्थकांमध्ये झाले. भाजप समर्थक आणि राष्ट्रवादी त्यापेक्षा अनगरकर पाटील समर्थक या उभयंतामधील विरोधाची धार कमी झाली. पण हे दोघी तह होण्याच्या निर्णयाकडे लक्ष देऊन आहेत.

दोन मोटरसायकलींसह २४० लीटर हातभट्टी दारु जप्त

सुराज्य/सोलापूर : दारूबंदी सप्ताहाच्या निमित्ताने राज्य उत्पादन शुल्क विभागाने राबवलेल्या विशेष मोहिमेत दि. ५ ऑक्टोबर रोजी सोलापूर शहरात २४० लिटर हातभट्टी दारुची वाहतूक करताना दोन मोटरसायकली जप्त करून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दि. २ ते ८ ऑक्टोंबर दरम्यात दारूबंदी सप्ताह राबविण्यात येत असून त्यानिमित्त जिल्हाभरात विशेष मोहीम राबविली जात आहे. यात अवैध हातभट्टी दारू, देशी-विदेशी दारू, ताडी इत्यादी विरुद्ध कडक कारवाई करण्यात येत आहे. दि. ५ऑक्टोबर रोजी दसरा सणानिमित्त सोलापूर महानगरपालिका परिसरात घोषित केलेल्या ड्राय डेच्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाने सोलापूर शहर परिसरात पाळत ठेवून निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अ विभाग संभाजी फडतरे यांना जोडभावी पेठ परिसरात एका दुचाकीवरून हातभट्टी दारूची वाहतूक होताना आढळून आल्याने त्यांनी त्या वाहनाचा पाठलाग केला असता वाहतूकदार इसम वाहन जागीच सोडून फरार झाला, या गुन्ह्यात स्कूटीसह एका रबरी ट्युब मध्ये असलेली १२० लिटर हातभट्टी दारू जप्त करण्यात आली असून एकूण ५६ हजार १०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. एका अन्य कारवाईत दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क अ २ विभाग उषाकिरण मिसाळ यांनी राज मेमोरियल शाळेसमोर सरवदे नगर, जुना विडी घरकुल परिसरात एका मोटरसायकल वरून हातभट्टी दारूची वाहतूक होत असल्याचे दिसून आल्याने पाठलाग केला असता आरोपी वाहन सोडून फरार झाला. या गुन्ह्यात रबरी ट्यूब मधील १२० लिटर हातभट्टी दारुसह वाहन असा एकूण ६६ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. दोन्ही गुन्ह्यातील आरोपी फरार असून गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या त्यांचा शोध घेण्यात येत आहे. हि कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक व उपअधीक्षक आदित्य पवार यांचे मार्गदर्शनाखाली निरीक्षक संभाजी फडतरे, दुय्यम निरीक्षक उषा किरण मिसाळ, सहायक दुय्यम निरीक्षक बिराजदार, जवान चेतन व्हनगुंटी, प्रियंका कुटे, शोएब बेगमपुरे, इस्माईल गोडीकट व वाहन चालक मदने यांच्या पथकाने पार पाडली.

तेलुगु भाषा अभिवृध्दी ग्रंथालयात अकिनेनी नागेश्वरराव जयंती साजरी

सुराज्य/सोलापूर : तेलुगु भाषा अभिवृध्दी सार्वजनिक ग्रंथालयम तर्फे डॉ. नटसम्राट अकिनेनी नागेश्वरराव यांची ९९ वी जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी डॉ. नागेश्वरराव यांच्या प्रतिमेचे पूजन आणि पुष्पहार अर्पण संस्थेचे कार्याध्यक्ष बालराज बोल्ली यांच्या हस्ते करण्यात आले. दिपप्रज्वलन उत्कर्ष सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नरसिंम मिसालोलु यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मल्लिकार्जुन कमटम होते. यावेळी मिसालोलु म्हणाले, अकिनेनी नागेश्वरराव यांनी एकूण २५५ चित्रपटात काम केले आहे. यामध्ये देविदास बालराजू, मुगगन्सुलु, दसरा बुल्लोडु, प्रेमनगर आदि अनेक चित्रपट सुपरहिट झाले. यावेळी श्रोत्यांना खाऊ वाटप करण्यात आला. प्रास्ताविक संस्थेचे सचिव तिपण्णा गणेरी यांनी केले. आभार यसंस्थेचे सहसचिव प्रभाकर भिमनाथ यांनी केले. या कार्यक्रमात ग्रंथपाल राजश्री बुधाराम, रामलु पोतु, राजु कुमार, गणेश सज्जन, श्रीनिवास गणेरी, जनार्दन इंजामुरी, रेवणसिध्द पुजारी, नागनाथ अक्कल, तिपण्णा चिनराज आदि श्रोते व चाहते उपस्थित होते.

लाईट ॲन्ड साऊंड लेसर शो या प्रकल्पाचे लोकार्पण

लेसर शोमधून उलगडले सिद्धरामेश्वरांचे चरित्र

सुराज्य/सोलापूर



सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिध्दरामेश्वर मंदिर परिसरातील तलावात स्मार्ट सिटी योजनेतून साकारण्यात आलेल्या लाईट अँड साऊंड लेसर शो या प्रकल्पाचे लोकार्पण मंगळवारी सायंकाळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे- पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. ३५ मिनिटांच्या या शोमधून सिध्दरामेश्वरांचे चरित्र उलगडून दाखविण्यात आले.

या कार्यक्रमास खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, आमदार विजयकुमार देशमुख, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी आमदार नरसिंग मेंगजी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलिस आयुक्त राजेंद्र माने, महापालिका आयुक्त पी. शिवशंकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, स्मार्ट सिटी चे मुख्य कार्यकारी अधिकारी त्रिंबक ढेंगळे-पाटील, उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहायक आयुक्त विक्रमसिंह पाटील, नगर अभियंता संदीप कारंजे, माजी सभागृह नेते संजय कोळी, संजय धनशेट्टी आदी उपस्थित होते. या लाईट अँड शो प्रकल्पात म्युझिकल फॉन्टन, ओन वॉटर स्क्रीन, लेझर थीम आणि लाईट शो बसवण्यात आले आहे. तसेच ऑडिओ व्हिडिओ ट्रॅक मध्ये असलेले या शोचा कालावधी ३५ मिनिटांचा आहे. सोलापूर शहराचा इतिहास स्वातंत्र्यलढ्यातील सोलापूरचे योगदान श्री ग्रामदैवत शिवयोगी सिध्दरामेश्वर यांचे चरित्र तसेच त्यांनी केलेले लोकोपयोगी कार्य शहरातील मुस्लिमांचे श्रध्दास्थान असलेले हाजी शहाजूर वली यांचे चरित्र यांचा समावेश असलेला हा माहितीपट मराठीसह कन्नड आणि हिंदी भाषेतून शो मधून दाखवण्यात येणार आहे. सोमवार ते शुक्रवारी दररोज सायंकाळी ७ ते ७:३० वाजता मराठीतुन माहितीपटाचे एक शो होईल व शनिवारी आणि रविवारी सायंकाळी ७ ते ७:३० व ८:०० ते ८:३० असे दोन शो मराठी व कन्नडमधून माहितीपट दाखविण्यात येईल.

दौंड-मानमाड सेक्शन दरम्यान दुहेरी मार्गाचे काम हाती

१८ ऑक्टोबरपर्यंत गाड्या रद्द

सुराज्य/सोलापूर : सोलापूर विभागाच्या दौंड-मानमाड सेक्शन दरम्यान ट्रॅफिक ब्लॉकच्या कामकरिता गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. येथील दुहेरी मार्गाचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे येथील कामाचा कालवधी वाढल्याने पुढे १८ ऑक्टोबर २०२२ पर्यंत संबंधीत गाड्या बंद राहणार आहेत, अशी माहिती रेल्वे प्रशासनाकडून देण्यात आली.

मध्य रेल्वेतील सोलापूर विभागाच्या दौंड-मानमाड सेक्शन दरम्यान दुहेरी मार्ग सुरू करण्यासंबंधीचे काम हाती घेण्यासाठी ट्राफिक ब्लॉक चालणार आहे. हा ब्लॉक दिनांक ८ ऑक्टोबर ते १८ ऑक्टोबर पर्यंत असेल. यामध्ये टर्न आउट स्लीपर घालणे, क्रॉसिंग भाग ट्रॅक सर्किट मध्ये बदल करणे, सध्याचे डिरेलिंग स्वीच नष्ट करणे, समाविष्ट करणे, नवीन क्रॉसओव्हर कामाकरिता गाड्या रद्द आणि मार्गात बदल करण्यात आला आहे.

रद्द करण्यात आलेल्या गाड्या

कोल्हापूर - गोंदिया एक्सप्रेस, गोंदिया - कोल्हापूर एक्सप्रेस, दादर -साई नगर शिर्डी एक्सप्रेस, साई नगर शिर्डी - दादर एक्सप्रेस, पुणे - भुसावळ विशेष एक्सप्रेस, भुसावळ- पुणे विशेष एक्सप्रेस, पुणे - जबलपूर विशेष एक्सप्रेस, जबलपूर - पुणे विशेष एक्सप्रेस, पुणे - वीरांगना लक्ष्मीबाई विशेष एक्सप्रेस, वीरांगना लक्ष्मीबाई - पुणे विशेष एक्सप्रेस, पुणे - राणी कामलापती एक्सप्रेस, राणी कामलापती - पुणे एक्सप्रेस, पुणे - नागपूर एक्सप्रेस, नागपूर - पुणे एक्सप्रेस, पुणे - बिलासपुर एक्सप्रेस, बिलासपुर - पुणे एक्सप्रेस, पुणे - नांदेड एक्सप्रेस, पुणे - काजीपेठ एक्सप्रेस आणि काजीपेठ - पुणे एक्सप्रेस या सर्व गाड्या ८ ते १८ ऑक्टोबर २०२२ दरम्यान रद्द करण्यात आल्या आहेत.

बबलाद तांडा येथे चाकूने मारहाण २ महिला जखमी

सुराज्य/सोलापूर : घरगुती भांडणातून चाकू आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत दोन महिला जखमी झाल्या. ही घटना बबलाद तांडा (ता. अक्कलकोट) येथे काल मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली.

सुमित्रा उमेश चव्हाण (वय २५) आणि अंजू पंडित राठोड (वय २२ रा. बबलाद) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना अक्कलकोट येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना आकाश चव्हाण आणि दोघांनी मारहाण केली. अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे. यावेळी झालेल्या मारहाणीत विलास देवलू राठोड (वय २०) हा देखील जखमी झाला. त्याला देखील रुग्णालयात दाखल करण्यात आले.

वेळापुरात पाईपलाईन दुरस्ती कामाचा शुभारंभ

सुराज्य/वेळापूर

वेळापुर ता. माळशिरस येथील खारे विहीर ते प्रा. आरोग्य केंद्र वेळापुर येथील पाण्याची टाकी पाईप लाईन दुरुस्त करणे या कामाचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्ह्याचे नेते उत्तमराव जानकर, बाळासाहेब धाईंजे यांच्याहस्ते श्रीफळ फोडुन संपन्न झाला.

यावेळी जि. प. सदस्य. बाळासाहेब धाईंजे, ग्रा. प. सदस्य संजयआबा मंडले, माळशिरस तालुका सामाजिक न्याय विभाग अध्यक्ष. रजनिश बनसोडे, मार्केट कमिटीचे माजी संचालक दादासाहेब घाडगे, जवान माने देशमुख, विनायक चंदनशिव, जब्बर मुलाणी, निवृत्ती भुसारे, सुखदेव आडत, नागेश क्षीरसागर, लखन माने दे, अमोल मंडलिक, धनंजय शिवपुजे, सुमित साखरे आदि. यावेळी उपस्थित होते,

लम्पी आजाराबाबत सूक्ष्म नियोजन करा : पालकमंत्री

सुराज्य/सोलापूर

राज्यामध्ये लम्पी आजाराने आतापर्यंत २१०० जनावरांचा मृत्यू झाला आहे. लम्पी आजाराची लागण मोठ्या प्रमाणात होऊ नये. झाली तर मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या.

नियोजन भवन येथे लम्पी आजाराबाबत राज्य टास्क फोर्सच्या बैठकीत विखे-पाटील बोलत होते. बैठकीला आमदार सुभाष देशमुख, सचिन कल्याणशेट्टी, राजेंद्र राऊत, समाधान आवताडे, रणजितसिंह मोहिते-पाटील, पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रतापसिंह, राज्य टास्क फोर्सचे अध्यक्ष डॉ. बिकाणे, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पालिका आयुक्त पि. शिवशंकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सोनवणे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे, विद्यापीठाचे तज्ज्ञ डॉक्टर आदी उपस्थित होते.

राज्यात गाय वर्गीय जनावरांना लम्पी आजार होऊन त्यांचा मृत्यू होण्याचे प्रमाण वाढत आहे. यावर टास्क फोर्सच्या अधिकाऱ्यांनी संशोधन करून मृत्यू नेमका होण्याचे कारणे शोधून उपाययोजना काय कराव्यात, हे सूचवावे. पशुधन मालकांची पशु ही संपत्ती आहे. जनावरांचा मृत्यू होऊ देऊ नका. बरी झालेली जनावरे लम्पी आजार न झालेल्या जनावरांमध्ये मिसळणार नाहीत, याबाबत काळजी घेण्याचे आवाहन देखिल केले.

टास्क फोर्सने राज्यातील सर्व जिल्हानिहाय पशुवैद्यकीय अधिकारी, डॉक्टर यांची ऑनलाईन कार्यशाळा घेवून मार्गदर्शन करावे. जनावरांची कोणती तपासणी करावी, निदान काय येईल, यावर कोणते उपचार करावेत, याविषयी कार्यशाळेत योग्य मार्गदर्शन करावे. पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी प्रत्येक गावनिहाय नकाशे करावेत. जनावरांचे पर्यवेक्षण करून उपचार करावेत. यामध्ये स्थानिक डॉक्टरांनी हलगर्जीपणा करू नये अशा सूचना केल्या.

लम्पी आजारामुळे जनावरे दगावलेल्या सोलापूर जिल्ह्यातील दहा पशुपालक लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरूपात पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय विकास मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते मृत्यू पडलेल्या प्रत्येक संकरित गायींसाठी तीस तर खिलार बैलासाठी पंचवीस हजार रुपये याप्रमाणे धनादेशाचे वाटप यावेळी करण्यात आले

राज्यात एक कोटी ४० लाख जनावरे असून एक कोटी १५ लाख लस उपलब्ध झाली आहे. सर्वांना वेगाने लसीकरण सुरू असून एक कोटी ८ लाख जनावरांचे लसीकरण झाले आहे. सध्या ५२ हजार पशु बाधित असून २१०० जनावरांचा मृत्यू झाला आहे. यामध्ये एकाही म्हशीचा समावेश नसल्याने म्हैशीची वाहतूक करण्यास परवानगी देण्यात आली.

जिल्ह्यात लसीकरणासाठी वाहनांची आवश्यकता असल्यास १५ व्या वित्त आयोगातून म्बुलन्स येता येतील. शिवाय जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे असलेल्या विना चालक रूग्णवाहिका तीन महिन्यासाठी घ्याव्यात. या रूग्णवाहिका लसीकरणासाठी वापरता येतील. पशुधन जास्त असलेल्या तालुक्यात दोन रूग्णवाहिका वापरून लसीकरणाचा वेग वाढविण्याच्या सूचना केल्या.

हनुमानवाडी येथ जिमचे उद्घाटन

सुराज्य/अकलूज : देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सेवा पंधरवडानिमित्त हनुमानवाडी येथे जिल्हा क्रीडा कार्यालयकडून मंजूर जिमचे उद्घाटन व महिला आर्थिक विकास महामंडळ कडून महिलांना खेळते भांडवल म्हणून देण्यात आलेल्या चेक चे वाटप विधान परिषद आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व शिवामृत दुध संघाचे चेअरमन धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, जेष्ठ नेते गणपतराव वायमोडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, भाजपा तालुका अध्यक्ष बाजीराव काटकर, माजी उपसभापती प्रतापराव पाटील, अर्जुनसिंह मोहिते पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य राहुल बापू वायमोडे, शंकर कारखान्याचे संचालक चंद्रकांत शिंदे, सरपंच सुरेखा हुंबे, माजी सरपंच प्रताप सालगुडे, दादा रुपनवर, शहाजी धाईगुडे, राजेंद्र पाटील, मामासाहेब घाडगे, आप्पासाहेब रुपनवर, संजय वायमोडे, युवा नेते शिवेंद्र हुंबे, ज्ञानदेव महानवर, सरपंच देविदास ढोपे, शिवराज निंबाळकर, उपसरपंच मधुकर चव्हाण, नितीन धाईगुडे, सतीश ढेकळे, एकशिव सरपंच रणजित पाटील, सागर रुपनवर, वैभव पाटील, राजेंद्र खराडे, विनोद हुंबे, शिरतोडे सरपंच, नाथा पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सागर रुपनवर, शुभम खराडे, माजी सरपंच शांतीनिकेतन साळवे, गणेश भुईटे व हनुमानवाडी गावातील ग्रामस्थ व कार्यकर्ते उपस्थित होते.

कोंडी परिसरातील अवैध धंद्यांवर कारवाई करावी : भोसले

सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी, पाकणी, चिंचोळी एमआयडीसी, भोगाव, केगाव, तिऱ्हे येथे अवैध धंदे पोलिसांच्या आशीर्वादाणे जोमाने चालू असून त्वरित कार्यवाही न केल्यास भाजप उत्तर तालुक्याच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा भाजप जिल्हा उपाध्यक्ष गणेश भोसले यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे केली आहे. वेळोवेळी दिलेल्या निवेदनाद्वारे पोलीस प्रशासन कारवाई करत नाही, कोंडी, पाकणी, एमआयडीसी, भोगाव, केगाव, वडाळा, नाझ्नज, तिऱ्हे आदी परिसरात रात्रीच्या वेळी अवैध धंदे जोमाने चालू असतात, पोलीस आर्थिक व्यवहार करण्या पलीकडे काहीही करत नसल्याने सर्व सामान्य नागरिक, प्रवासी, स्थानिक राहिवासीयांना त्रास होत आहे. बेकायदेशीर जुगार, मटका, डिझेल व पेट्रोल विक्री, दारू विक्री, करणाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. होवुन समूळ नष्ट करण्यात यावे, असे मागणीचे निवेदन राज्याचे गृहमंत्री व महाराष्ट्र पोलीस महानिरीक्षकांनाही देण्यात आले आहे. अवैध व्यवसाय करणाऱ्याना पोलीस प्रशासन पाठीशी घालत असून संबधित विभागाची चौकशी करून कारवाई न झाल्यास भाजप महिला व युवा मोर्चाच्या वतीने कोंडी येथे राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करणार आहोत यावेळी भाजप महिला कार्यकर्ते उपस्थित होते.

सायकल बँक उपक्रमातून मुलींना सायकली वाटप

सुराज्य/सोलापूर : जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्रमांक १ चे नंबर वन फाउंडेशन च्या वतीने जिल्हा परिषद सोलापूरच्या मुलींसाठी सुरू केलेल्या सायकल बँकेस महसूल पशुसवर्धन, दुग्धविकास तथा सोलापूरचे नूतन पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते दक्षिण, उत्तर सोलापूर, तालुक्यातील मुलींना प्रातिनिधीक स्वरूपात ११ सायकलींचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी, आमदार राम सातपुते, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन चंचल पाटील, इशाधीन शेलकंदे, कार्यकारी अभियंता जलसंधारण पंडीत भोसले, शिक्षणाधिकारी माध्यमिक भास्करराव बाबर, संजय जाविर, गट विकास अधिकारी दक्षिण सोलापूर बाळासाहेब वाय, गटविकास अधिकारी पंढरपूर, प्रशांत काळे गटशिक्षणाधिकारी दक्षिण सोलापूर म्हलारी आदी उपस्थित होते.

शिवाजीराव दुधाळ यांचे निधन

सुराज्य/पिलीव : पिलीव (ता. माळशिरस) येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजीराव कृष्णा दुधाळ (वय ६४) यांचे अल्पशा आजाराने सोमवारी निधन झाले. त्यांनी रयत शिक्षण संस्थेत पिलीव, भाळवणी याठिकाणी शिक्षक म्हणून तर दहीवडी व सातारा याठिकाणी मुख्याध्यापक म्हणुन काम पाहिले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी, दोन मुले असा परिवार आहे.

नगरच्या विखे-पाटलांना पहिल्याच दौऱ्यात सोलापुरी हिसका; शिवसेना प्रणित शिंदे गटाचा तेज तडका

पालकमंत्र्यांसमोर गटातटाच्या राजकारणाचे प्रदर्शन

भाजपाच्या कार्यक्रमात देशमुख गट समर्थकांची केवळ मांदियाळी

सुराज्य/सोलापूर

अहमदनगर स्थित पूर्वाश्रमीचे कॉंग्रेसचे नेते आणि सध्याचे भाजप व शिंदे गट प्रणित विद्यमान शिंदे-फडणवीस सरकारमधील मंत्री, सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पालकमंत्रीपदाच्या आपल्या पहिल्याच दौऱ्यात सोलापूरी हिसका अनुभवायला मिळाल्याची चर्चा आता चांगलीच रंगली आहे.

विखे-पाटील यांच्यावर दबाव आणण्याचा प्रकार शिवसेनेच्या सोलापूर जिल्ह्यातील 'पॉवर'बाज शिंदे गटाने केला. तर दुसरीकडे शहरातील भाजपाचे वजनदार नेते तसेच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू आमदार विजयकुमार देशमुख यांच्यासह पक्षाच्या काही पदाधिकाऱ्यांनी नव्या पालकमंत्र्यांच्या दौऱ्याकडे जाणीवपूर्वक पाठ दाखवून जे काही दाखवून द्यायचे होते, ते दाखवून दिले. 'समजनेवाले को काफी इशारा... याचाच प्रत्यय विजयकुमार देशमुख यांनी आणून दिला. जिल्ह्याचे नवे पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील मंगळवारी सोलापूर शहराच्या दौऱ्यावर होते, त्यांच्या उपस्थितीत अनेक कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले होते. त्यापैकी गांधी नगरमधील एका मंगल कार्यालयात भाजपाचा कार्यक्रम हा एक मुख्य होता. या कार्यक्रमाला पूर्णपणे भाजपाची किनार होती.

तथापि राधाकृष्ण विखे-पाटील हे पालकमंत्री होण्याला शिवसेना शिंदे गटाचे मोठे योगदान आहे, तेव्हा पालकमंत्र्यांनी अगोदर आमचे ऐकले पाहिजे असे पवित्रा येत विखे - पाटील यांना गाठून त्यांच्यावर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. भाजपच्या पदाधिकाऱ्यांना भेटण्यापूर्वी शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांना भेटा, संवाद साधा असे शिंदे गटाचे नेते, संपर्क प्रमुख तानाजी सावंत तसेच अमोल शिंदे यांनी आक्रमक होवून सांगत रान पेटवले.

गांधीनगरातील भाजपाच्या खास आयोजित कार्यक्रमाकडे आ. विजयकुमार देशमुख यांच्यासह त्यांच्या गटाच्या समर्थक कार्यकर्त्यांनी या कार्यक्रमावर जणू बहिष्कार घातला. जो कार्यक्रम झाला, त्यामध्ये आमदार सुभाष देशमुख गटाचेच पदाधिकारी त्यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित असल्याचे दिसून आले.

भाजप गट पुरस्कृत पालकमंत्री विखे-पाटील यांच्यासमोर सोलापुरातील भाजपामधील गटा -तटाच्या राजकारणाचे प्रदर्शन झाले. पालकमंत्री जे काही समजायचे ते समजले. पण त्यांनी भाजपामधील सर्वांनाच सबुरीचा सल्ला दिला. जुने तसेच नवे वाद न करता, हातात हात घालून एकोप्याने काम करण्याचा सल्ला विखे - पाटलांनी दिला.

राजकीय हाडवैर...

आमदार सुभाष देशमुख आणि आमदार विजयकुमार देशमुख यांच्या गटांमधील राजकीय दुष्मनीचे राजकारण तसे दिल्लीच्या तख्तापर्यंत माहीत आहे. दोघे देशमुख एकमेकांचे तोंड बघायला तयार होत नाहीत, इतके गटातटाच्या राजकारणाचे, राजकीय हाडवैर या दोघांमध्ये आहे, हे सोलापूरकरांना अनेकवेळा दिसले आहे. दोघांमधील हा वाद मिटवण्याचे प्रयत्न यापूर्वी कित्येक वेळा झाले. मात्र प्रत्येकवेळी 'पालथ्या घड्यावर पाणी' याचाच प्रत्यय आला. असे असताना भाजपाचे ज्येष्ठ नेते विखे-पाटलांनी मौलीक सल्ला दिला. 'हातात हात घालून काम करा, जुने नवे वाद काढत बसू नका' असाच त्यांचा मौलीक सल्ला. हा त्यांचा सल्ला कितीपत ऐकला जाईल यावर प्रश्नचिन्ह आहे.

पाणीपुरवठा टेंडर फिक्सिंगप्रकरणी झेडपीचा अभियंता सक्तीच्या रजेवर ; चौकशी समितीची नियुक्ती

सुराज्य/सोलापूर

भ्रष्टाचार, अनियमितता आणि पाणीपुरवठ्याच्या टेंडर फिक्सिंगप्रकरणी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक कोळी यांना सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या कार्यकाळातील सर्वच टेंडर प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी समिती नियुक्त करण्याचा आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिला.

याबरोबरच जिल्हा क्रीडाधिकारी नितीन तारळकर यांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त त्यांचीही झाडाझडती येतीली याप्रकरणीही आमदारांची चौकशी समिती नियुक्त केली तर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, जिल्हा भूमी अभिलेख आणि वनविभागाच्या अधिकाऱ्यांना कारवाईची तंबी देत नॅशनल हॉयवे , क्रिडा, वन, विभागाचा केला पोस्टपार्टोम केले.

मंगळवारी नियोजन भवनात जिल्हा नियोजन समितीच्या पहिल्याच बैठकीत पालकमंत्री विखे-पाटील यांनी निष्क्रिय व कामचुकार अधिकाऱ्यांवर ताशेरे ओढत चौफेर फटके बाजी केली. पहिल्याच बैठकीत कामाची चुणूक दाखवून दिली. त्यांच्या या कार्यपध्दतीने कामचुकार अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

आमदार सुभाष देशमुख यांनी जलजीवन मिशनच्या कामामध्ये व टेंडरमध्ये भ्रष्टाचार झाल्याची तक्रार करत एकाच व्यक्तीला वारंवार टेंडर देत असल्याचा आरोप केला. आमदार राम सातपुते,यशवंत माने यांनीही यात भाग येत या योजनेमध्ये मोठा भ्रष्टाचार झाल्याच्या तक्रारी केल्या.

त्यानंतर पालकमंत्री विखे-पाटील यांनी पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता कोळी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांना योग्य स्पष्टीकरण देता न आल्याने सक्तीच्या रजेवर पाठवण्याचे आदेश दिले. तसेच झालेल्या टेंडर प्रक्रियेची राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि पाटबंधारे विभागाच्या तीन अधिकाऱ्याकडून चौकशी करण्याचे आदेश त्यांनी दिले. याप्रकरणी पंधरा दिवसात चौकशी अहवाल देण्याचा सूचनाही त्यांनी केली.

पानमंगरुळ ग्रामपंचायतवतीने सेवा पंधरवडा अभियान

सुराज्य/अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील पानमंगरुळ ग्रामपंचायतीच्या वतीने सेवा पंधरवाडा अभियान कालावधी स्वच्छता ही सेवा अभियान कार्यक्रम गटविकास अधिकारी सचिन खुडे यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे राबवण्यात आली.

प्रथमतः महात्मा गांधीजी व संत गाडगेबाबा गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजा करून व घंटागाडीचे पूजा करून ग्रामपंचायत व नूतन विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमानाने अभियानाचे सुरुवात करण्यात आली. ग्रामपंचायत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसर, बस स्टॅण्ड, गाव परिसर इत्यादी ठिकाणचे कचरा उचलून स्वच्छता करण्यात आले. वैयक्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छतेबाबत विद्यार्थी व ग्रामस्थांना माहिती सांगण्यात आले. सदर अभियानाचा सरपंच रत्नाबाई धोंडाप्पा महाजन, उपसरपंच मलिक मुजावर, ग्रामविकास अधिकारी शिवानंद सोलापुरे, ग्रा. पं. सदस्य सुगलाबाई कत्ते, जयश्री पवार, अण्णाप्पा अरबाळे, महादेव सुंकद, अशपाक मुजावर, गुरुण्णा मुडगी, महादेव महाजन, श्रीशैल पुजारी, रवी बनसोडे, उमेश बनसोडे, माजी सरपंच शिवशंकर जमादार, चिदानंद कुंभार सहभागी होते.

हनुमान दूध संस्थेकडून सभासदांना दिवाळीसाठी लाभांश

सुराज्य/अकलूज : माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील हनुमान दूध व्यावसायिक संस्थेने यंदाच्या दिवाळीसाठी सभासदांना प्रति लिटर ७० पैसे लाभांश देण्याचा निर्णय घेतला आहे.

आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व भाजपा संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तांदुळवाडी येथील हनुमान दूध व्यवसायिक संस्था कार्यरत असून संस्थेच्या दुध संकलन केंद्रावर विजया दशमी दसऱ्याच्या निमित्ताने श्री हनुमान प्रतिमेचे पुजन दुध उत्पादक बाबुराव मिले व दुध संकलन साहित्य व काट्याचे पुजन संस्थेचे संचालक नामदेव लक्ष्मण धनवडे यांच्या हस्ते करण्यात आले. हनुमान दुध संस्थेने २ एप्रिल २०२२ पासुन पुन्हा दुध संकलन सुरु केले आहे. दुध उत्पादकांना तांदुळवाडी मध्ये दुध दरामध्ये जुलै अखेर २ रु. जादा दर व ऑगस्ट पासुन १ रु ५० पैसे जादा दुध दर दिला आहे. जादा दर देवुन सुध्दा एप्रिल ते जुन अखेर आलेल्या दुधावर प्रति लिटर ७० पैसे लाभांश देण्याचा निर्णय घेतला आहे. अल्पावधीतच ७० पैसे लाभांश देवुन २०२३ च्या दिपावली ला पण कायम १ रु जादा दर देवुन १ रु च्या वर लाभांश देण्याचा प्रयत्न करु असे चेअरमन बापु डोके यांनी सांगितले.

गावच्या विकासाचे ध्येय साध्य करा : कलशेट्टी

सुराज्य/अक्कलकोट

गावकऱ्यांनी स्वछतेचा मुलमंत्र अंगीकारून गावाचा विकास ध्येय साध्य करुन घेण्यास पुढाकार घ्यावा असे आवाहन यशदाचे उपसंचालक मल्लीनाथ कलशेट्टी यांनी केले. जेऊर येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोग मार्फत उत्तीर्ण झालेल्या पाच अधिकारी वर्ग आणि शालेय विद्यार्थी यांच्या मार्गदर्शन प्रसंगी बोलत होते.

जेऊर येथे सकाळी आठ पासून चार वाजेपर्यंत विविध उपक्रम घेण्यात आले. ज्यात सकाळी जेऊर येथील मुख्य रस्त्यावर स्वच्छता कार्यक्रम घेण्यात आले. श्री काशीविश्वेश्वर हायस्कूल जेऊर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विद्यार्थी स्वच्छता साहित्य तसेच वाद्यवृंदासाह स्वच्छता घोषणा देत पूर्ण रस्ते स्वच्छ करण्यात आले व त्यावेळी या सर्व अधिकारी वर्गाने विद्यार्थ्यांना संबोधन करून प्लास्टिक व कचरा यांचे धोके व स्वछेतेचे महत्व विषद करून विदयार्थ्यांना प्रेरणा दिली. यावेळी गटविकास अधिकारी सचिन खुडे, जि. प. सदस्य मल्लिकार्जुन पाटील, सरपंच पार्वती झंपले, उपसरपंच काका पाटील व सर्व सदस्य, शिवाजीराव कलमदाणे, नागनाथ सुरवसे सर, ग्रामविकास अधिकारी सुरेश कोळी, केंद्रप्रमुख गंगाधर जमादार, मुख्याध्यापक राजकुमार अमोग, दत्तात्रय कवठे, गंगाधर इरशेट्टी, माध्यमिक व प्राथमिक शिक्षक उपस्थित होते.

माळीनगर येथे जलजीवन मिशन योजनेचे उद्घाटन

सुराज्य/माळीनगर

माळीनगर ग्रामपंचायतीच्या जलजीवन मिशन योजने अंतर्गत नवीन पाणी पुरवठा योजनेचे भूमिपुजन दि. ०२ ऑक्टोबर रोजी दि सासवड माळी शुगर फॅक्टरीचे मॅनेजिंग डायरेक्टर राजेंद्र गिरमे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माळीशुगर फॅक्टरीचे चेअरमन नंदकुमार गिरमे हे होते.

यावेळी कारखान्याचे होलटाईम डायरेक्टर सतिश गिरमे, व्हा. चेअरमन परेश राऊत, माजी मॅनेजिंग डायरेक्टर अरविंद जाधव, संचालक राहुल गिरमे, गणेश इनामके, विशाल जाधव, निळकंठ भोंगळे, निखिल कुदळे, शुगरकेन चे चेअरमन अमोल ताम्हाणे, महात्मा फुले पतसंस्थेचे व्हा. चेअरमन महादेव एकतपुरे, शिरीष फडे, प्रकाश एकतपुरे, एच के कांबळे, हरिभाऊ वायमोडे सरपंच अभिमान जगताप, उपसरपंच नागेश तुपसौंदर्य आदी र उपस्थित होते. या पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत पंचावन्न लीटर प्रति माणूस फिल्टर केलेले पाणी नळाद्वारे पोहोचवता येणार आहे. सदर योजना साधारण २४ कोटी रूपयांची असून ३० महिन्यात काम पुर्ण करण्यात येणार आहे. अनेकांनी हा प्रकल्प लांबणीवर टाकण्यासाठी प्रयत्न केले अपप्रचार केला परंतु शासकीय अधिकारी, अभियंता यांनी प्रत्यक्ष सर्वेक्षण करून या कामास मंजूरी दिली असून माळीनगर ग्रामपंचायत हद्दीतील पवार वस्ती, बडे वस्ती, जयसिंह नगर, महादेव नगर ठिकाणी सुध्दा पुर्ण क्षमतेने पाणीपुरवठा होईल अशी माहिती राजेंद्र गिरमे यांनी आपल्या भाषणात बोलताना दिली. यावेळी ग्रामपंचायत माळीनगर सरपंच, उपसरपंच, सदस्य, कारखान्यातील अधिकारी, कामगार, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सरपंच अभिमान जगताप यांनी केले तर आभार संग्राम भोसले यांनी मानले.

संभाजी चौक नवरात्र महोत्सवाचे विविध कार्यक्रम

सुराज्य/कुर्डूवाडी : कुर्डूवाडी येथील छत्रपती संभाजी चौक नवरात्र महोत्सव मंडळ म्हसोबा गल्लीच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमास महिलांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमास दररोज देवीच्या आरतीला उपस्थित राहणाऱ्या महिलांना लकी ड्रॉ द्वारे शिवसेनेचे गटनेते नगरसेवक बबनराव बागल यांच्या वतीने पैठणी देण्यात आली.

नवरात्र महोत्सव मंडळाच्या भव्य शामियाला व डेकोरेशनचे उद्घाटन, स्लो सायकल स्पर्धा, सुक्त पठण, पाककला स्पर्धा, होम मिनिस्टर, फॅशन शो. उखाणे स्पर्धा, नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. चार ऑक्टोबर रोजी कुर्डूवाडी भूषण पुरस्कार प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवी वायमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय गोरे यांनी मानले. सोमवार दि. १० रोजी भव्य छबीना मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले तर मिरवणूक संपल्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून भावी भक्तांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन शिवसेनेचे नगरसेवक बबन बागल यांनी केले आहे.

वाळू माफियांचे समूळ उच्चाटन गरजेचे : विखे-पाटील

उपसा सुरू असलेल्या ठिकाणच्या तहसीलदार, तलाठ्यांना सूचना

सुराज्य/पंढरपूर

वाळू उपसा सुरू असणाऱ्या ठिकाणचे तहसीलदार, तलाठ्यांना निलंबन करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी पंढरपूर येथे झालेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिली.

नाशिक महसूल आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जाणार असून या अंतर्गत देशातील इतर राज्यातील वाळूचे धोरण तपासून महाराष्ट्रासाठी वाळूचे सर्वंकष धोरण आणणार असल्याची घोषणा केली. वाळूमाफिया मुळे गुन्हेगारी वाढली आहे. सामाजिक शांतता धोक्यात आली आहे. वाळूचे लाभार्थी सर्वच स्तरात आहेत. त्यामुळे वाळू माफियांचे समूळ उच्चाटन करणे गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने कठोर कारवाई करण्याची गरज आहे. वाळू माफियाकडून वाळू उपसा सुरू असलेल्या ठिकाणचे तहसीलदार, तलाठी यांना निलंबन करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. पंढरपूर विकास आराखडा संदर्भात अनेक निवेदन आली आहेत. ज्या गावचा विकास करायचा आहे. त्याच गावाला माहीत नसेल काय होणार आहे. त्या विकासाचा काय उपयोग. सर्वांना एकत्र बोलावून पंढरपुरात बैठक घेऊ. या विकास आराखड्यासाठी प्रभारी अधिकारी असेल तर त्याला सर्व एजन्सींशी संपर्क ठेवणे अवघड जाते. यामुळे स्वतंत्र अधिकारी देणार असल्याचे पालकमंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

विठ्ठल मंदिराला अप्पर जिल्हाधिकारी

विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी हा उपजिल्हाधिकारी दर्जाचा असतो. गाजनन गुरव यांच्याकडून कार्यकारी पदाचा पदभार काढल्यानंतर त्यांच्या जागी अप्पर जिल्हाधिकारी संजीव जाधव यांची नियुक्ती केली होती. कार्यकारी अधिकारी या पदासाठी यापुढे अप्पर जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी देणार असल्याचे विखे पाटील यांनी सांगितले.

स्त्रियांनी स्वसामर्थ्यावर कर्तृत्व सिध्द केले : डॉ. रायते

श्रीमंतयोगी प्रतिष्ठानचे नारीशक्ती पुरस्काराचे वितरण

सुराज्य/सोलापूर

स्त्रियांमध्ये खूप कार्यक्षमता असते. त्यामुळेच स्त्रियांनी स्वतःच्या सामर्थ्यावर विविध क्षेत्रात कर्तुत्व सिध्द केले आहे. नवरात्रोत्सवात श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने नवदुर्गांचा सन्मान हा प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार आनंदश्री प्रतिष्ठानच्या अध्यक्षा डॉ. माधवी रायते यांनी केल्या. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठानच्या वतीने रंगभवन चौकाजवळील समाजकल्याण केंद्रात नवरात्रोत्सवानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नऊ महिलांना नारीशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यावेळी अध्यक्षा डॉ. रायते बोलत होत्या. यावेळी विचार मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य कृषी व ग्रामीण पर्यटन महासंघाचे संचालिका सोनाली जाधव-मस्के, नेत्ररोग तज्ञ डॉ. तन्वंगी जोग, उद्योजिका सायली जवळकोटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. स्मिता पाटील, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट आदी मान्यवर उपस्थित होते.

संस्थापक महेश कासट यांनी प्रस्ताविकात नवरात्रीनिमित्त आदिशक्तींच्या नऊ रूपाप्रमाणेच विविध क्षेत्रातील नऊ महिलांचा नारीशक्ती पुरस्काराने सन्मान होणार असल्याचे सांगितले. सुत्रसंचालन अक्षता कासट यानी केले तर आभार प्रदर्शन गणेश येळमेली यानी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भारती जवळे, सुजाता सक्करगी, अर्चना बंडगर, सारिका मदने, मयुर गवते, केशव भैय्या, संतोष अलंकुटे, श्रीपाद सुत्रावे, मंगेश कुलकर्णी, अभिजीत होनकळस, राहुल बिराजदार, जगदीश पाटील, प्रा. गणेश लेगंरे, प्रकाश आळंगे, सौरभ करकमकर आदींनी परिश्रम घेतले.

यांचा झाला नारीशक्ती पुरस्काराने सन्मान

सामाजिक कार्यकर्त्या स्वाती पाटील (महिला आर्थिक सक्षमीकरण), सोलापूर रेल्वे डीआरएम मुख्य कार्यालय अधीक्षक सविता जाधव (प्रशासकीय), भागाईवाडीच्या माजी सरपंच कविता घोडके-पाटील (ग्रामविकास), ज्वेलरी उद्योजिका स्मिता देशपांडे (उद्योजिका), डॉ. सारिका होमकर (वैद्यकीय), रियल इस्टेट कन्सल्टंट अंजली मालाणी-भाटे (व्यवसाय), मासाई चाटला (लघु उद्योग), ओम इंडस्ट्रीजच्या प्रोप्राइटर मनिषा डागा (उद्योजक, उत्पादन), सहव्यवस्थापिका लक्ष्मी आरगी (पतसंस्था) आदी नऊ मान्यवर महिलांचा या पुरस्काराने सन्मान करण्यात आला. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

शहांवर मेहबुबा संतापल्या, म्हणाल्या ढोल बडवत फिरताय

मला नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा फोटो ट्वीट करत केला दावा

सुराज्य/नवी दिल्ली

पिपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्याला श्रीनगरमधील घरी नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे. बारामुल्ला जिल्ह्यातील पट्टण येथे प्रवास करण्यापासून आपल्याला रोखण्यात आलं असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तीन दिवसांच्या जम्मू काश्मीर दौऱ्यावर असून बारामुल्ला जिल्ह्यात सभेला संबोधित करणार आहेत.

पट्टण येथे ही सभा होणार आहे. याआधी श्रीनगरमध्ये त्यांनी बैठक घेत सुरक्षेचा आढावा

घेतला. मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्या घराच्या गेटचा फोटो ट्वीट करत नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे. जम्मू काश्मीर पोलिसांनीही तात्काळ उत्तर देत त्यांच्यावर कोणतंही बंधन नसून, त्या हवं तिथे फिरु शकतात असं स्पष्ट केलं. जम्मू काश्मीर पोलिसांनी केलेल्या ट्वीटनंतर मेहबुबा मुफ्ती यांनी त्यांचा दावा फेटाळला असून, ते खोटं बोलत असल्याचा आरोप केला आहे. पिपल्स डेमोक्रॅटिक पक्षाच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी आपल्याला श्रीनगरमधील घरी नजरकैदेत ठेवण्यात आल्याचा दावा केला आहे. पट्टण येथे प्रवास करण्यापासून आपल्याला रोखण्यात आलं असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तीन दिवसांच्या जम्मू काश्मीर दौऱ्यावर असून बारामुल्ला जिल्ह्यात सभेला संबोधित करणार आहेत. पट्टण येथे ही सभा होणार आहे. याआधी श्रीनगरमध्ये त्यांनी बैठक घेत सुरक्षेचा आढावा घेतला.

■ मेहबुबा मुफ्तींचं ट्वीट काय?

गृहमंत्री जम्मू काश्मीरमध्ये सर्व काही सामान्य झालं असल्याचं ढोल बडवून सांगत आहेत. पण मला घरामध्ये नजरकैदेत ठेवण्यात आलं आहे. एका कार्यकर्त्याच्या लग्नासाठी मला पट्टणला जायचं होतं. जर एका माजी मुख्यमंत्र्यांचे मुलभूत अधिकार अशाप्रकारे काढून घेतले जात असतील, तर सर्वसामान्याचं काय होत असेल याचा विचार आपण करु शकतो, असं मुफ्ती मोहम्मद यांनी म्हटलं आहे. अमित शाह यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी श्रीनगर आणि बारामुल्लादरम्यान ५० किमी हायवेवर निर्बंध लावले आहेत. वाहतुकीच्या मार्गातही बदल करण्यात आले आहेत.

■ पोलिसांना फेटाळला दावा

पोलिसांनी मेहबुबा मुफ्ती यांचा दावा फेटाळत त्यांनीच आपला गेट बंद केला असल्याचं म्हटलं आहे. त्यांच्यावर कोणतेही बंधन नसल्याचा दावा पोलिसांनी केला असून, सोबत गेटचा फोटोही शेअर केला आहे.

■ मेहबुबा मुफ्तींचं प्रत्युत्तर

मेहबुबा मुफ्ती यांनी पोलिसांचे हे आरोप फेटाळले आहेत. त्यांनी ट्वीट करत म्हटलं आहे की मला रात्री पोलीस महासंचालकांनी पट्टणला तुम्ही प्रवास करु शकत नाही असं सांगितलं. आज जम्मू काश्मीर पोलिसांनी स्वत:हून माझ्या घराचा गेट आतून बंद केला आणि उघडपणे खोटं बोलत आहेत. यंत्रणाच अशाप्रकारे वागत आहेत याचं वाईट वाटतं.

मुकेश अंबानी यांना जीवे मारण्याची धमकी

मुंबई : रिलायन्स उद्योग समुहाचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी आणि त्यांच्या पत्नी नीता अंबानी यांना पुन्हा एकदा जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. एका अज्ञात व्यक्तीने रिलायन्स फाऊंडेशनच्या कार्यालयात एक फोन करुन अंबानी परिवाराला जीवे मारण्याची धमकी दिली आहे. मुंबई पोलिसांनी या प्रकरणाची तात्काळ दखल घेत तपास सुरू केला आहे. मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाची सुरक्षा व्यवस्था आणखी कडक करण्यात आली आहे. आज दुपारी १ वाजण्याच्या सुमारास रिलायन्स फाउंडेशनच्या सर एचएन हॉस्पिटलच्या लँडलाईनवर एक अज्ञात नंबरवरुन कॉल आला होता. हे हॉस्पिटल बॉंबने उडवून देण्याची धमकी या कॉलच्या माध्यमातून देण्यात आली. तसेच मुकेश अंबानी आणि नीता अंबानी यांनाही जीवे मारण्याची धमकी यावेळी देण्यात आली. या प्रकरणाची दखल डीबी मार्ग पोलिसांनी घेतली असून त्यांचा तपास सुरू आहे.

आता स्क्रिनशॉट काढता येणार नाही

मुंबई : व्हॉट्सपवर आता तुम्हाला स्क्रिनशॉट काढता येणार आहे. कंपनी व्हॉट्सपवर स्क्रिनशॉट काढण्यावर बंदी आणण्याच्या विचारात आहे. यासाठी कंपनीकडून नवीन फिचरची तपासणी सुरु आहे. अनेक दिवसांपासून या फिचरची मागणी करण्यात येत होती. हे फिचर आल्यास युजर्सना एकदा पाहामध्ये पाठवलेल्या फोटो किंवा व्हिडीओचा स्क्रनशॉट काढता येणार नाही. व्हॉट्सपने गेल्या वर्षी स्नॅपचॅट सारखं फिचर आणलं आहे. यामध्ये युजर्सना एक मीडिया एकदा पाहण्याची परवानगी असते. मात्र या फिचरमध्ये त्रुटी आहेत, कारण युजर्स हा वन टाईम मीडियाचे स्क्रिनशॉट काढू शकतात. ज्यामुळे या फीचरच्या सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. यानंतर आता यावर उपाय म्हणून स्क्रिनशॉट घेण्यावर बंदी आणणार आहे.

लम्पीमुळे राज्यात २ हजार जनावरांचा मृत्यू

मुंबई : राज्यात लम्पी स्कीन आजाराचा धोका वाढत आहे. त्यामुळं राज्यातील पशुपालक चिंतेत आहेत. लम्पी स्कीनमुळं आत्तापर्यंत राज्यात २ हजार १०० जनावरांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी डॉक्टरांना काही सूचना केल्या आहेत. डॉक्टरांनी हलगर्जीपणा करु नये. मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावं अशा सूचना विखे पाटील यांनी दिल्या आहेत. राज्यामध्ये आत्तापर्यंत लम्पी आजाराने २ हजार १०० जनावरांचा मृत्यू झाला आहे. लम्पी आजाराची लागण मोठ्या प्रमाणात होऊ नये. लागण झाली तर मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना विखे पाटील यांनी दिल्या आहेत. सोलापूर तेथील नियोजन भवन येथे लम्पी आजाराबाबत राज्य टास्क फोर्सच्या बैठकीत विखे पाटील बोलत होते.

मी सामान्य कार्यकर्त्यांसाठी मैदानात : शशी थरुर

मुंबई : सध्या काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक लागली आहे. या निवडणुकीत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते खासदार मल्लिकार्जून खर्गे आणि तिरुअनंतपुरमचे खासदार शशी थरुर आमने सामने आहेत. दरम्यान, या निवडणुकीबाबत शशी थरुर यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मी काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांसाठी अध्यक्षपदाची निवडणूक लढवत आहे. त्यामुळं अध्यक्षपदासाठी भरलेला अर्ज मागे घेणार नसल्याचे शशी थरुर यांनी स्पष्ट केलं आहे. मी काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांसाठी अध्यक्षपदाची निवडणूक लढवत आहे. ज्यांनी माझ्यासाठी सर्वस्व पणाला लावले, त्यांचा मी कधीही विश्वासघात करणार नाही. मी त्यांना कधीही निराश करणार नसल्याचे शशी थरुर म्हणाले. काँग्रेसच्या अध्यक्षपदाच्या शर्यतीत मी स्वतःसाठी नसून, काँग्रेसच्या सामान्य कार्यकर्त्यांसाठी आहे.

मी कधीही कोणासमोर झुकणार नाही, आता २०२४ च्या तयारीला लागा : पंकजा

सुराज्य/बीड

मी संघर्षाला घाबरत नाही. छत्रपती शिवरायांचा पराक्रम आणि भगवानबाबांची सात्विकता आणि मुंडे साहेबांचा संघर्ष हीच माझी ओळख असल्याचे मत भाजपच्या नेत्या पंकजा मुंडे यांनी व्यक्त केलं. मी थकणार नाही, थांबणार नाही आणि कधीही कोणासमोर झुकणार नाही असेही त्या म्हणाल्या. छत्रपती संभाजीराजेंचा आदर्श माझ्यासमोर आहे. त्यामुळं मी संघर्ष करत राहणार असल्याचे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. मी आता कोणताही अपेक्षा करणार नाही. मी आता २०२४ च्या निवडणुकीच्या तयारीला लागली असल्याचे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. भगवान भक्तीगड सावरगाव इथे आयोजित करण्यात आलेल्या दसरा मेळाव्यात पंकजा मुंडे बोलत होत्या.

माझे लोक म्हणजे समुद्र आहे. समुद्राला बांधणे शक्य नसल्याचे पंकजा मुंडे म्हणाल्या. जर कोणी समाजात भिंती उभ्या करण्याचा प्रयत्न केला तर त्याला क्षमा करणार नाही असा इशाराही त्यांनी दिला. लोकांना प्रेम नाही दिलं तर खुर्च्या रिकाम्या राहतील. आता माझ्याकडे कोणतेही पद नाही. देवेंद्र फडणवीसांनी २०१९ मध्ये महाजनादेश यात्रा काढली होती, त्यावेळी

सभा घेण्यासाठी मी महाराष्ट्रभर फिरले. आता हे लोक माझी ताकद वाढवण्यासाठी आले आहेत. ज्या मुशीतून आमचे नेते आले त्याच मुशीतून मी आले आहे. आमच्यात व्यक्ती श्रेष्ठ नाही तर संघटन हेच श्रेष्ठ असल्याचे पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या.

आता आमदारांची यादी आली तर माझं नाव येऊ नका

आता आमदारांची यादी आली तर माझं नाव येऊ नका, असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. मी कोणावरही नाराज नाही. मी का नाराज होऊ, असेही मुंडे यावेळी म्हणाल्या. मोठ्या मोठ्या लोकांना राजकारणात संघर्ष आला आहे. योग्य वेळेची वाट बघा असेही पंकजा मुंडे यावेळी म्हणाल्या. मी आता २०२४ च्या तयारीला लागली आहे. मला कोणताही गर्व नाही, मी स्वाभिमानी आहे. मी तुम्हाला असत्य कधीही बोलणार नाही. सत्य कधीही पराजित होत नाही असेही त्या म्हणाल्या.

कोणासमोर काही मागायला जाणार नाही

आता मी २०२४ ला पक्षाने तिकीट दिलं तर तयारीला लागणार आहे. मला कोणत्याही नेत्याबद्दल काही बोलायचे नाही. आम्ही कमळाशिवाय दुसऱ्या बटणाला कधीही स्पर्श केला नाही, हे सांगताना पंकजा भावनिक झाल्याचे पाहायला मिळालं. मी कधीही कोणासमोर काही मागायला जाणार नाही. मी कधीही उतणार नाही, मातणार नाही, आणि घेतला वसा टाकणार नाही. मी तुमच्यासोबत काम करणार आहे. आपण आपलं काम करणार आहोत, आता पदाची अपेक्षा करु नका असेही मुंडे यावेळी म्हणाल्या.

लष्कराने ४ दहशतवाद्यांना केले ठार; चकमक अद्यापही सुरु

सुराज्य/नवी दिल्ली

जम्मू काश्मीरमध्ये जैश-ए-मोहम्मदच्या तीन आणि एका स्थानिक दहशतवाद्याला ठार करण्यात आलं आहे. शोपियन जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी झालेल्या चकमकींमध्ये भारतीय लष्कराला हे यश मिळालं. द्राच परिसरात एक चकमक सुरु असून, मुलू येथेही भारतीय लष्कराकडून कारवाई सुरु आहे.

सुरक्षा जवानांनी द्राच परिसरात दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदशी संबंधित तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला, तर मुलू येथे एका दहशतवाद्याला ठार करण्यात आलं. पोलिसांनी ट्वीट करत यासंबंधी अधिक माहिती दिली आहे. ठार करण्यात आलेले दोन दहशतवादी एसपीओ जावेद दार यांच्या हत्येत सहभागी होते.

एसपीओच्या हत्येचा बदला

ठार करण्यात आलेले दहशतवादी हनान बिन याकूब आणि जमशेद हे दोघे एसपीओ जावेद दार यांच्या हत्येत सहभागी होते. २ ऑक्टोबरला दहशतवाद्यांनी जावेद दार यांची हत्या केली होती. तसंच पुलवामा येथे २४ सप्टेंबरला झालेल्या एका कामगाराच्या हत्येतही या दहशतवाद्यांचा सहभाग होता अशी माहिती पोलिसांनी दिली आहे.

सर्वधर्मसमभाव हा गांडूळ विचार,

संभाजी भिडेंची जीभ पुन्हा घसरली

सुराज्य/सांगली

शिवप्रतिष्ठानचे संस्थापक संभाजी भिडे आपल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे सतत चर्चेत असतात. त्यांनी पुन्हा वादग्रस्त वक्तव्य करून चर्चेला तोंड फोडलं आहे.

सर्वधर्म हा गांडुळ विचार असून तो इतिहासाला धरून नसल्याचं संभाजी भिडे म्हणाले. बुधवारी सांगतील दुर्गामात दौड समारोप आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. खासदार, आमदार आणि लोकप्रतिनिधी देशासाठी कलंक असतात. सर्वधर्म हा गांडूळ विचार आहे, हा सत्य विचार नसून असत्य विचार आहे, हा इतिहासाला धरून विचार नाही, असे मत व्यक्त करत आपल्या मातृभूमीसाठी जगणारी माणसं पाहिजे आहेत, पण इथेच बोंब आहे. साधी गोष्ट घ्या, लोक निवडून देतात, ते आमचे खासदार काय? आमदार काय, लोकप्रतिनिधी काय? शरम वाटत नाही. सगळेजण पगार घेतात, भाडोत्री. हे बेकार असून आपल्या लोकशाहीला आणि परंपरेला कलंक आहेत, अशा सणसणीत शब्दांत भिडे गुरुजी यांनी राजकारण्यांवर पुरोगामी भूमिकेवर टीका केली आहे. विजयादशमीच्या प्रथेप्रमाणे शिवप्रतिष्ठानच्या दुर्गमाता दौडची सांगता सांगतील करण्यात आली. संभाजी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली ३५ वर्षांपासून सांगतील या दौडचे आयोजन केले जाते. कोरोनामुळे पुकारलेल्या लॉकडाऊनमुळे दोन वर्षे दौडचे आयोजन करण्यात आले नव्हते.

धार्मिक असंतुलन नजरेआड करून चालणार नाही : सरसंघचालक

सुराज्य/नागपूर

नागपूरच्या रेशीमबाग मैदानात आज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी सोहळा पार पडला. या सोहळ्यात सरसंघचालक मोहन भागवत यांनी स्वयंसेवकांचे प्रबोधन केले. देशात धर्माच्या आधारावर निर्माण होणारे लोकसंख्येचे असंतुलन यापुढे नजरेआड करून चालणार नाही, असे सरसंघचालकांनी म्हटले आहे.

एखाद्या देशात लोकसंख्येचा असमतोल तयार होतो, तेव्हा त्या देशाच्या भौगोलिक सीमादेखील बदलून जातात, असा इशारा भागवत यांनी दिला आहे. देशात लोकसंख्या धोरण तयार व्हायला पाहिजे. ते सर्वांसाठी समान पद्धतीने लागू व्हावे, अशी मागणी मोहन भागवत यांनी केली

आहे. लोकसंख्येच्या असमतोलाचा परिणाम आपण ७५ वर्षांपूर्वी पाहिला आहे. २१ व्या शतकात याच समस्येमुळे पूर्व तिमोर, दक्षिण सुदान आणि कोसोवा हे तीन स्वतंत्र देश अस्तित्वात आले. इंडोनेशिया, सुदान आणि सर्बियातील लोकसंख्येच्या असमतोलाचाच हा परिणाम आहे, असे भागवत यांनी विजयादशमी सोहळ्यात अधोरेखित केले.

अजिंक्य रहाणे दुसऱ्यांदा झाला बाप

मुंबई : भारतीय क्रिकेट संघाचा फलंदाज अजिंक्य रहाणेची पत्नी राधिकाने मुलाला जन्म दिला आहे. अजिंक्य रहाणेने सोशल मीडियाच्या माध्यमातून आपल्या चाहत्यांना ही खुशखबर दिली. राधिका आणि बाळ दोघेही सुखरूप आहेत, असे ट्विट राहणे याने केले आहे.

रहाणेने ट्विटर आणि इंस्टाग्रामवर एक पत्र शेअर केले आहे. बुधवारी सकाळी पत्नी राधिकाने मुलाला जन्म दिल्याची माहिती त्याने ट्विरद्वारे देली. या पत्राद्वारे त्याने चाहत्यांचे आभारही मानले आहेत. आज सकाळी राधिका आणि मी माझ्या मुलाचे या जगात स्वागत केले. राधिका आणि बाळ दोघेही सुखरूप आहेत. अजिंक्य रहाणेने सप्टेंबर २०१४ मध्ये राधिकासोबत लग्न केले.

व्यवसायात गुंतवणुकीच्या आमिषाने २५ लाखांची फसवणूक

औरंगाबाद : व्यवसायात गुंतवणुकीचे आमिष दाखवून गुंतवणूकदाराची २५ लाखांची फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. हा प्रकार १० सप्टेंबर २०१८ ते १६ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत जुनाबाजार येथे घडला. या प्रकरणी एमआर कंपनीच्या संचालकाविरुद्ध सिटीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. दरम्यान, कंपनीचे संचालक जुनैदखान यांनी हे राजकीय षडयंत्र असल्याचा दावा केला आहे.

याप्रकरणी अबुल हसन अली खुर्म आली हाश्मी (रा. हिमायतबाग) यांनी तक्रार दाखल केली. जुनाबाजार येथे एमआर ग्रुप मल्टी बिजनेस कंपनीने कार्यालय उघडले होते. आमच्या विविध व्यवसायात गुंतवणूक केल्यास आकर्षक नफा देण्याचे आमिष कंपनीने अली यांना दाखवले होते. त्याला भुलून अली यांनी २५ लाख रुपये गुंतवले होते. त्यापोटी नफा म्हणून सुरुवातीला तीन लाख २२ हजार रुपये बँक खात्यात जमा झाली होती.

त्यानंतर अली यांच्या खात्यात नफा झाला नाही. तसेच कंपनीच्या नियमाप्रमाणे गुंतवणूक प्रमाणपत्र, नफ्याचा परतावा व मूळ रक्कम न देता अली यांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप आहे. याप्रकरणी अली यांच्या तक्रारीवरून कंपनीचे संचालक जुनैदखान, उबेदखान जावेदखान, जैदखान आणि अय्याजखान इजहारखान यांच्या विरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कोल्हापूरचा शाही दसरा परंपरा आणि आधुनिकतेचा संगम

सुराज्य/कोल्हापूर

नवरात्र उत्सवात करवीर नगरीत चैतन्याचा प्रवाह वाहतो. त्याला कारणे दोन. साडेतीन खंडपीठांपैकी एक शक्ती देवता असलेल्या महालक्ष्मीचा शारदीय नवरात्र उत्सव. दुसरे कारण अर्थातच कोल्हापूरचा शाही दसरा. एक प्राचीन परंपरा तर दुसरी ऐतिहासिक. ऐतिहासिक पाऊलखुणांवरून वाटचाल करणारा शाही दसरा आता पूर्वीइतका भव्य होत नसला तरी त्याचे महत्त्व, तेज अद्यापही कायम आहे. आता तर राज्य शासनाने २५ लाख रुपयांची मदत करीत तो ग्रँड इव्हेंट'करण्याचे जाहीर केले आहे. शाही दसऱ्यावर शासनमान्यतेची मोहोर उमटली आहे.

परंपरा कधीपासून?

छत्रपती शिवाजी महाराजांनी पन्हाळगड जिंकल्यानंतर पुनश्चः कोल्हापूर परिसर स्वराज्यात समाविष्ट झाला. महाराणी ताराबाईंच्या काळात

कोल्हापूर शहरास राजधानीचे स्वरूप प्राप्त झाले. पूर्वीच्या काळी विजयादशमीला शस्त्रपूजा करून युध्दभूमीवर पाऊल टाकले जात असे. मराठेशाहीच्या काळात कोल्हापुरातील दसरा अधिक प्रभावीपणे साजरा केला जाऊ लागला.

शाही दसरा कसा साजरा केला जात असे?

मराठेशाहीच्या काळात दसऱ्याचा थाट भव्य-दिव्य होता. त्याचे वर्णन आजही मोठ्या कौतुकाने केले जाते. करवीर संस्थानात आठवडाभर आधी तयारी सुरू असे. विजयादशमीदिनी दिवस मावळतीला झुकू लागल्यावर भवानी मंडपातून शाही मिरवणूक सुरू होत असे. बंदुकीतून बार उडवला की मिरवणूक पुढे सरकत असे. सजवलेला हत्ती, अश्वदल, उंट, लष्करी वाद्यमेळा, पायदळ असा क्रम असे. पारंपारिक वाद्य आणि इंग्रजी चालीचा बँड याचा सुरेख मेळ लोकांना खिळवून ठेवत असे. अंबाबाई ,भवानी, देवी गुरु महाराज अशा तीन पालख्या नियत. पालखीमागे छत्रपती महाराज, मानकरी, सरदार, इनामदार, जागीरदार, प्रतिष्ठित नागरिक, अधिकारी, मल्ल असत. ऐतिहासिक दसरा चौकात मिरवणूक पोहोचे. सुशोभित शामियान्यात छत्रपती परिवार विराजमान होत असे. पुरोहित मंत्रोच्चार करीत शमीपूजन करीत. महाराजांना विडे दिल्यानंतर श्रीमंत महाराज शमीपूजन करीत. सूर्य मावळला की मग सोने लुटण्यासाठी झुंबड उडत असे.

शाही दसऱ्याचे आजचे स्वरूप कसे आहे?

संस्थाने विलीन झाली असली तरी आजही शाही दसऱ्याची परंपरा छत्रपती घराणे आणि छत्रपती देवस्थान ट्रस्ट'कडून जपली जाते. शाही सीमोल्लंघन सोहळ्याचे महत्त्व कायम आहे. भव्य मिरवणुका अलीकडे नियत नाही. तथापि, शाही दसरा आणि त्याची करवीरकरांची आंतरिक जोडलेली नाळ आजही कायम आहे. याचे दर्शन दसरा चौकात जमलेली गर्दी दर्शवते. कालानुरूप बदलही दिसतो. ४० कोटींच्या मेबॅक मोटारीमधून शाही परिवाराचे आगमन होते. तेव्हा मोठ्या प्रेमाने त्यांचे स्वागत केले जाते. उत्सवात कधीतरी व्यत्यय येतो. मागील दोन वर्षे शाही दसरा साजरा करण्यात मर्यादा आल्या. करोनाचे निर्बंध हे त्याचे निमित्त होते.

रोपळे जि.प. गटाच्या विकासात

सुभाष माने यांचे मोठे योगदान : परिचारक

सुराज्य/सोलापूर

रोपळे (ता. पंढरपूर) येथील सुभाष माने यांनी जिल्हा परिषदेमध्ये सत्ताधारी पक्षापेक्षा विरोधी पक्षाची भूमिका बजावत रोपळे गटातील तेरा गावांसाठी भरघोस निधी खेचून आणला,असे प्रतिपादन माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी केले.

ईश्वरवठार (ता.पंढरपूर) येथे प्राचार्य सुभाष माने यांच्या ६५ व्या वाढदिवसानिमित्ताने भव्य नागरी सत्कार व विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा व पांडुरंग साखर कारखान्याच्या संचालक मंडळाच्या सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बबनदादा शिंदे होते. पंचायत समितीचे माजी सभापती वामनराव माने, जिल्हा परिषद सदस्य वसंत देशमुख, बाजार समितीचे सभापती दिलीप घाडगे, दिनकर मोरे आदी उपस्थित होते.

परिचारक म्हणाले की, महात्मा गांधींनी ग्रामविकासाची जी संकल्पाना केली होती. ती संकल्पना ईश्वरवठार मध्ये माने बंधूंनी राबवली व आपल्या गावाचा विकास केला. (कै.) सुधाकरपंत परिचारक यांनी परिवारातील लोकांवर जे संस्कार केले या संस्कारातून माने बंधूंनी अनेक मुलांना घडवले व त्यांचे संसार उभे केले. निवडणुकीला उभे राहिले की आपण कामे केली पाहिजेत ही (कै.) सुधाकरपंत परिचारक यांची भूमिका होती. या भूमिकेतून प्राचार्य सुभाष माने यांनी काम केले.

आमदार बबन दादा शिंदे म्हणाले, गत पाच वर्षात जिल्हा परिषदेच्या माध्यमातून रोपळे गटाचा विकास करण्यासाठी सुभाष माने यांनी उत्तम काम केले आहे, हिवरे बाजारचे पोपटराव पवार यांना ईश्वरवठार हे गाव दाखवण्यासाठी मी स्वतः येवून येणार असल्याचे आमदार बबनदादा शिंदे यांनी सांगितले. यावेळी माजी पंचायत समिती सभापती वामनराव माने म्हणाले की, शिंदे व परिचारकांनी आमच्या माने बंधूवर जो विश्वास दाखवला आहे. त्या विश्वासाला कुठेही तडा जावू देणार नाही. गावातील लोकांनी जे प्रेम दिले ते आमच्यासाठी खूप मोठे आहे. यावेळी सरपंच सितादेवी माने,डॉ. प्रतापसिंह माने, उपसरपंच विजयसिंह माने, विक्रमसिंह माने, अजयसिंह माने, औदुंबर मेटकरी, संजय देशमुख, प्राचार्य उत्तम कोकरे, मधूकर चौगुले, आप्पा खांडेकर, संपतराव देशमुख, हणमंत देशमुख, धोंडीबा गलांडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सुभाष माने यांनी व्यक्त केली कृतज्ञता

(कै.) सुधाकरपंच परिचारक यांनी घालून दिलेल्या आदर्श तत्तवानुसार जिल्हा परिषदेमध्ये काम केले. काम करत असताना रोपळे गटातील १३ गावांच्या विकास कामांसाठी ११ कोटी रुपयांचा निधी आणला. या कामासाठी आमदार बबनदादा शिंदे व प्रशांत परिचारक यांचे सहकार्य मिळाले. नेता सक्षम असेल तर काम करण्यास वाव मिळतो. आमदार बबनदादा शिंदे, प्रशांत परिचारक आणि मी स्वतः ईश्वरवठार गावासाठी ९ कोटी रुपयांची विकास कामे केली आहेत. शिवाय कोणत्याही गावात दुजाभाव न करता, सर्व गावांना भरघोस निधी दिल्याचे सांगत जिल्हा परिषद सुभाष माने यांनी आतापर्यंत रोपळे गटातील विविध संस्थांच्या पदाधिकारी, सरपंच आणि नागरिकांच्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

चंदननगरात घर फोडून रक्कमसह चांदीची नाणी लंपास

सोलापूरः जुळे सोलापुरातील चंदननगर येथे अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा तोडून घरातील ६९ हजार रुपये रोख रक्कम व चांदीचे ३५ नाणी चोरून नेल्याची घटना दि.३० सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर २०२२ दरम्यान घडली.याप्रकरणी दिव्या सतेंद्र शर्मा (वय-३६, रा.चंदननगर मेन रोड,जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. शर्मा या या घरातील मुख्य दरवाजाला लॉक करून कामानिमित्त औरंगाबाद येथे गेल्या होत्या.त्यावेळ चोरट्याने घराचे लॉक तोडून घरातील देवघराच्या खोलीत लाकडी कपाटातील रोख रक्कम ४ हजार रुपये,ऑफिसच्या बॅगमधील रोख रक्कम ४ हजार रुपये,फिर्यादी यांच्या आईच्या खोलीतील कपाटा मधील रक्कम ५ हजार रुपये तसेच ३५ चांदीचे नाणी चोरून नेली आहे. तपास पोसई. मुरकुटे हे करीत आहेत.

सुरवसे स्कूलच्या समोरून दुचाकी पळवली

चोरट्याने सुरवसे इंग्लिश मीडियम स्कूल महाराणा प्रताप झोपडपट्टी येथे पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.बीटी.१४३९ चोरून नेली आहे.याप्रकरणी मुबीन शुकुर शेख (वय-३२,रा.साईनाथ नगर भाग ३) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक शिर्के हे करीत आहेत.

भिम प्रतिष्ठानने दिला अंधांना काठीचा आधार

सोलापूर : सोलापुरातल्या भीम प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने मंगळवारी धम्मचक्र प्रवर्तन दिनाचे औचित्य साधून भैरूरतन दमाणी अंधशाळेतील विद्यार्थ्यांना पांढरी काठीचे वाटप करण्यात आले.. याप्रसंगी प्रा. डॉ. रावसाहेब पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन संस्थेचे अध्यक्ष वीरेंद्र हिंगमीरे यांनी केले. यावेळी भरतकुमार मोरे, संस्थेचे संस्थापक बाबा बाबरे, अध्यक्ष वीरेंद्र हिंगमीरे,सिध्दांत बाबरे, रवी चाकोते, राजेंद्र माने, अकबर शेख, अशोक डोळसे, प्रथमेश लामतुरे, प्रेम अंकुश आदींची उपस्थिती होती प्रारंभी वीरेंद्र हिंगमिरे यांनी प्रास्ताविकेत गेल्या वीस वर्षापासून भिम प्रतिष्ठानच्या वतीने आंबेडकर जयंती मिरवणूक खर्चाला फाटा देऊन विधेयक उपक्रम राबवत असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन राजेंद्र माने तर आभार सिध्दांत बाबरे यांनी मांडले या कार्यक्रमास दमानी अंधशाळेतील शिक्षक व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

चंदनशिवे यांच्याकडून पालकमंत्र्यांना निवेदन

सोलापूर : सोलापूर जिल्ह्याचे नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना सोलापूर शहरातील विविध विकास कामे व समस्या या संदर्भात माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी निवेदन सादर केले. याप्रसंगी मा.खासदार डॉ. जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, आ. सुभाष देशमुख, आ. सचिन कल्याणशेट्टी आमदार समाधान आवताडेख, आमदार राम सातपुते, जिल्हा अधिकारी मिलिंद शंभरकर आयुक्त पि शिवशंकर, श्रीकांचना यन्नम, अमोल शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी चंदनशिवे यांनी पालकमंत्री विखे-पाटील यांचा सत्कार केला.

विश्वासात घेऊनच पंढरपूरचा विकास आराखडा

शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांचे प्रतिपादन

पंढरपूर : पंढरपूर विकास आराखड्यासह श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील प्रथा, परंपरा बाबत महाराज मंडळी व व्यापाऱ्यांनी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. यावर पाटील यांनी यापुढे सर्वांना विश्वासात घेवूनच निर्णय घेणार असल्याचे आश्वासन दिले.

सोलापूर जिल्ह्याच्या दौर्यावर असलेल्या चंद्रकांत पाटील यांनी विठ्ठल रूक्मिणीचे दर्शन घेवून येथील प्रसाद महाराज अंमळनेरकर यांच्या मठात हजेरी लावली. यावेळी चैतन्य महाराज देगलुरकर, संजय महाराज देहुकर महाराज, मदन महाराज हरिदास, विष्णू महाराज कबीर, गणेश महाराज कराडकर आदींसह विविध महाराज मंडळी उपस्थित होते. रूंदीकरणामुळे अनेक प्राचीन वास्तू, जुने मठ, पुरातन वाडे पाडले जाणार असल्याची भीती स्थानिकांमध्ये निर्माण झाली आहे. यामुळे मंदिर परिसरातील स्थानिकांसह व्यापाऱ्यांनी आंदोलन देखील केले. अंमळनेकर महाराज मठात देखील पाटील यांना वारकऱ्यांचे मोठे नुकसान होणार असल्याचा मुद्दा मांडण्यात आला. पंढरीत येणारा बहुतांश वारकरी हा सामान्य शेतकरी, शेतमजुर असल्याने त्यांना मोठ्या हॉटेल अथवा लॉजमध्ये राहणे परवडत नाही, असे सांगण्यात आले.

त्रासदायक असणारा आराखडा राबविला जाणार

स्थानिकांसह, महाराज मंडळी यांना त्रासदायक ठरेल असा कोणताही आराखडा राबविला जाणार नाही. याबाबत आपण पालकमंत्री विखे-पाटील यांच्याशी देखील चर्चा केली आहे. श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिरातील प्रथा, परंपरा देखील कायम राहतील. यामध्ये कोणताही हस्तक्षेप अथवा बदल केला जाणार नसल्याचे आश्वासन चंद्रकांत पाटील यांनी यावेळी दिले.

पगारीसाठी शिक्षक नेत्यांनी अधिकाऱ्याचे थेट घर गाठले

सोलापूर : जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांच्या पगारीस होणारा विलंब टाळण्यासाठी गुरुसेवा परिवारातील शिक्षक नेत्यांनी थेट कोल्हापूर गाठून शिक्षणाधिकारी डॉ. किरण लोहार यांची पगाराच्या बीडीएस वर सही घेऊन पगार लवकर होण्याकरिताचा मार्ग सुकर केला.

याकरिता सोलापूर जिल्हा प्रा. शिक्षक संघटनेचे सरचिटणीस सुर्यकांत हत्तूरे (डोगे), उत्तर संघाचे अध्यक्ष अनिरुध्द पवार, गुरुसेवा पॅनलचे उमेदवार शिवाजी पाटील यांनी वरिष्ठ सहाय्यक विजय कुलकर्णी यांना सोबत घेऊन शिक्षणाधिकाऱ्यांचे कोल्हापूरातील निवासस्थान गाठले. त्यांची तब्येतीची विचारपूस करून आवश्यक कागदपत्रांवर सही घेतली.

यापुढे पगार वेळेवर होतील असे वाटत असतांना वेळेत बजेट मिळाले नाही. बजेट मिळाले पण शिक्षणाधिकारी डॉ. किरण लोहार आजारी असल्याने चालू महिन्याच्या पगारीस पुन्हा विलंब होणार हे लक्षात येताच या शिष्टमंडळाने कोल्हापूरात जाऊन साहेबांची सही घेण्याचा निर्णय घेतला. १० हजार प्राथमिक शिक्षकांचा ८८ कोटींच्या पगार वेळेत व्हावा म्हणून हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात आले.

मोहोळच्या तहसिलदारांबद्दल पालकमंत्र्यांसमोर तक्रार

मोहोळ : मोहोळ तहसिल कार्यालयातील निवासी नायब तहसीलदार भालचंद्र यादव हे लोकांना खूप त्रास देतात, कामे व्यवस्थित करत नाहीत अरेरावीची भाषा वापरतात अशी तक्रार तहसीलदार यांचे समोरच पालकमंत्र्याकडे एका कार्यकर्त्याने केली. भाजपाचे प्रसिध्द प्रमुख महेश सोवणी हे कार्यकर्त्याचे काम घेऊन तहसिलदार भालचंद्र यादव यांच्याकडे गेले होते. त्यावेळी त्यांनी सरळ साधे काम असतानाही ते न करता त्यांनाच अरेरावीची भाषा वापरली होती त्यामुळे ते संतप्त झाले होते याबाबत त्यांनी थेट नूतन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते त्यावेळी पालकमंत्र्याच्या शेजारी मोहोळचे तहसीलदार प्रशांत बेंडसे उभे असताना त्यांच्या समोरच तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार भालचंद्र यादव यांच्या बद्दल तक्रार केली. पालकमंत्र्यांनी याची ताल्काळ दखल घेऊन तहसीलदार प्रशांत बेंडसे यांना सुनावले व भालचंद्र यादव यांचेवर कारवाईच आश्वासन दिले.

अकलूज येथे प्रवाह भक्तीरसाचा भव्य कीर्तन सोहळ्याचे आयोजन

सुराज्य/सोलापूर

अकलूज येथिल श्री आनंदी गणेश सेवाभावी संस्था आयोजीत उद्योग महर्षि कै. उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या ६२ व्या जयंती निमित्त प्रवाह भक्तीरसाचा या भव्य किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. शंकरनगर येथिल स्मृती भवन येथे आयोजीत या भक्तीमय कार्यक्रमाचे ऊद्घाटन राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे हस्ते करण्यात आले. त्याप्रसंगी सोलापुर जिल्हा भाजपा चे संघटन सरचिटणीस धैर्यशील मोहिते-पाटील उपस्थित होते.

सलग ५ दिवस महाराष्ट्रातील नामवंत किर्तनकारांच्या किर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवरत्न उद्योग समुहाचे चेअरमन किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील व माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते-पाटील यांनी दिली. ६ ऑक्टोबर या कालावधीत राज्यातील नामवंत २० किर्तनकार आपल्या मधुरवाणीने किर्तन सोहळ्यात किर्तनाच्या माध्यमातुन प्रबोधन करणार आहेत. याप्रसंगी स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, आ.रणजितसिंह मोहिते-पाटील, किशोरसिंह माने-पाटील, सतिश माने-पाटील, किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील, शिवतेजसिंह मोहिते-पाटील, क्रांतीसिंह माने-पाटील सुनिल खेडकर, किर्तनकार ह.भ.प.सतिश महाराज डोईफोडे, शिवाजी कांबळे, मोहिते-पाटील व माने-पाटील कुटुंबीय आणि नागरिक उपस्थित होते. सुहास उरवणे आणि राजाराम गुरव यांनी कार्यक्रमाच सूत्रसंचालन केले.

इंचगाव येथील अपघातात अधिकारी बचावले; गाईचा मूत्यू

विरवडे : इंचगाव (ता. मोहोळ) येथे महामार्गावर गाय उदळत रस्त्यावर आली.वन विभागाच्या वाहनाचा वेग अधिक असल्याने लवकर ब्रेक लागला नाही. यामध्ये गाय वाहनाला धडकून रक्तबंबाळ होऊन खाली पडून मृत झाली तर अधिकारी बचावले. वन विभाग १ ते ७ ऑक्टोबर दरम्यान वन सप्ताह साजरा करत आहे. पंढरपूर येथे वन सप्ताहाच्या कार्यक्रमासाठी सोलापूर जिल्ह्यात विविध तालुक्यात नियुक्त असलेले वनपाल, वनरक्षक कार्यक्रम आटोपून पंढरपूर वरून सोलापूर कडे येत होते. इचगाव येथे रोडवर गाय उदळत रस्त्यावर आली.वन वाहनाच्या चालकाने वेगात वाहनाचा ब्रेक मारून गाडीला थांबविले. यात गायीला धडक बसली आणि ती मृत पावली. वाहनात वनरक्षक अविनाश गायकवाड,अनिता शिंदे, यशोदा आदलिंगे, श्रीशैल पाटील,गंगाधर विभूते, तुकाराम बादणे, वनपाल-रुकेश कांबळे, शंकर कुताटे, शशिकांत सावंत, चालक कृष्णा नरवणे होते. ग्रामस्थांनी नुकसान भरपाईची मागणी केली आहे. अपघातात आम्हीच थोडक्यात बचावलो आहे अन्यथा मोठी दुर्घटना घडली असती असे वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

घंटागाडी कामगाराचे हृदयविकाराने निधन

अधिक तास काम केल्यानेच मृत्यू झाल्याचा पत्नीने केला आरोप

सुराज्य/सोलापूर

महानगरपालिका विभागीय क्रमांक ५ कडील घंटागाडी बिगारी दत्तात्रेय भगवान सोनवले यांचे हृदयविकाराच्या झटक्याने रात्री निधन झाले. दरम्यान, आठ तासापेक्षा अधिक तास काम केल्याने त्यांचा मृत्यू झाला आहे.१२ तास काम करून घेऊन राजलक्ष्मी स्वंयम रोजगार संस्थेने या घंटागाडी कर्मचाऱ्याचा बळी घेतला असल्याचा आरोप त्यांच्या पत्नीने केला आहे.

या घटनेमुळे घंटागाडी कर्मचाऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. महापालिका विभागीय कार्यालय पाचकडील घंटागाडी कर्मचारी दत्तात्रय सोनवले हा नित्य प्रमाणे रोज पहाटे ५:३० वाजता घंटागाडी रॅम्पवर हजर असायचा. तेथील सुपरवायझर शिंदे हा ठेकेदाराच्या सांगण्यानुसार त्याला रोज सायंकाळी ५ ते ६ वाजता कामावरून घरी सोडायचा. कामाची सुट्टीची वेळ दुपारी २ ची असताना त्याच्याकडून अधिक ३ ते ४ तास अधिक काम करून घेतले जात होते.असा आरोप त्यांच्या पत्नीने केला आहे.मक्तेदारांनी महापालिका प्रशासनाच्या केलेल्या करारानुसार घंटागाडी कर्मचाऱ्यांकडून आठ तास काम करणे बंधनकारक असून तरीही त्याला जास्त वेळ काम सांगितले जात होते. शंभर टक्के रूट चे काम करून देखील त्याला अतिरिक्त काम सांगितले जात होते. त्यामुळे तो नेहमी परेशान असायचा असे त्याच्या पत्नीने सांगितले.

सर्वस्वी जबाबदारी मक्तेदाराची : सदाफुले

यासंदर्भात महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले, सायमन गट्टू, श्रीनिवास रामगल यांच्याकडे नातेवाईकांनी तक्रार केली आहे. दरम्यान, अध्यक्ष सदाफुले यांनी वर्क्समन कॉम्प्सेशन ऐक्ट १९२३ मधील तरतुदीनुसार घंटागाडी कर्मचारी मृत्यू झाल्यास सर्वस्वी जबाबदारी ही मक्तेदारांची राहील असे सांगितले.

सोलापूरचा कायापालट करण्याचा प्रयत्न : पालकमंत्री

चार पुतळा सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन

सुराज्य/सोलापूर

महापुरुषांच्या आशीर्वादातून नवी ऊर्जा मिळते. सोलापूर जिल्ह्याला ऐतिहासिक, धार्मिक व पौराणिक इतिहास आहे. सोलापूरचा कायापालट करण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे, अशी ग्वाही पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिली.

महानगरपालिकेच्या वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर आणि हुतात्मा मल्लप्पा धनशेट्टी, हुतात्मा श्रीकिसन सारडा, हुतात्मा जगन्नाथ शिंदे व हुतात्मा अब्दुल कुर्बान हुसेन यांचा पुतळा परिसर सुशोभीकरण कामाचे भूमिपूजन तसेच महापालिकेच्या कौन्सिल हॉलसमोरील उद्यानातील विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानपत्र प्रदान स्मृती शिलालेखाचे अनावरण पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमास खासदार डॉक्टर जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी, आमदार सुभाष देशमुख, आमदार सचिन कल्याणशेट्टी, आमदार राम सातपुते, माजी आमदार नरसिंग मेंगजी, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, महापालिका आयुक्त पी. शिवशंकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, माजी सभागृह नेते श्रीनिवास करली, माजी विरोधी पक्ष नेते अमोल शिंदे, माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांच्यासह पदाधिकारी व अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

राजेश मुंगळे यांच्या सागर कन्स्ट्रक्शनला हा मक्ता देण्यात आला आहे. तसेच विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना सोलापूर नगरपालिकेने मानपत्र अर्पण केले होते. या घटनेचे स्मरण म्हणून महापालिकेच्या कौन्सिल हॉलसमोरील उद्यानात मानपत्र प्रदान स्मृती शिलालेख बसवण्यात उभारण्यात आला आहे. या शिलालेखाचे अनावरण आज मंगळवारी पालकमंत्री राधाकृष्ण विखे - पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या शिलालेख उभारणीसाठी २ लाख ९५ हजार रुपये खर्च आला आहे. महाराणा प्रताप कन्स्ट्रक्शन कंपनीला या कामाचा मक्ता देण्यात आला होता. याप्रसंगी महापालिकेचे नगर अभियंता संदीप कारंजे, उपअभियंता एस. एम. आवताडे, उद्यान अधीक्षक रोहित माने, प्रयास संस्थेचे सचिन शिंदे यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

पवारांनी चांगले राज्य चालवण्याचा सल्ला ठाकरेंना द्यायला हवा होता

राज्य कसे चालवायला हवे असा सल्ला शरद पवार यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना देणे ऐवजी यापूर्वी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना जर दिला असता तर आज महाआघाडीवर ही वेळ आली नसती शरद पवारांनी आपल्या उत्साही राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी ही सबुरी घेण्याचा सल्ला द्यावा असा टोला महसूल मंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी लगावला. भूमिपूजनानंतर पालकमंत्री विखे पाटील पत्रकारांशी बोलत होते. आज भाजप आणि शिंदे गटाचे सरकार आलेले आहे. अधोगतीत केलेल्या सरकारला पुनर्वैभव मिळवून देण्यासाठी आज आम्ही काम करत आहोत. आगामी काळात महाआघाडी सरकारने थांबवलेली सर्व कामे आता मार्गी लागतील असेही विखे पाटील म्हणाले.